पुणे, किशोर–वर्ष ५४, अंक ५ वा, मे २०२५ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.54, Issue 5, May, 2025 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

मे २०२५





# आपला महाराष्ट्र

दत्तात्रय जोशी

किती सुंदर समृद्ध निसर्ग हा पहा
आपलेसे घेतो करूनि महाराष्ट्र हा ....

छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी
थोर संतमहात्मे विभूतींची ही भूमी
प्रतिभावंत कलावंत येथील महा

डोंगर-दऱ्या संथपणे वाहती नद्या
हिरव्याकंच जंगलांची किती संपदा
भाग्यवंत आम्ही आमुचा जन्म येथे हा

मायभूमी कर्मभूमी सर्व दिग्गजांची
महाराष्ट्राचे आम्ही आहोत रहिवासी
चव या भाकरीची या घेऊनी पहा

किती सुंदर समृद्ध निसर्ग हा पहा
काळजात राही भरून महाराष्ट्र हा
शिवरायांची भूमी पुण्य, राष्ट्र हे महा

# किशोर

मे २०२५, वर्ष ५४ वे, अंक ५ वा, वैशाख–ज्येष्ठ, शके १९४७

**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
सचिन मेहता
प्र.नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

**निर्मिती अधिकारी :**
हेमंत बाबर

**अक्षरजुळणी :** किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

**वितरण व्यवस्थापक :**
जी. आर. पानसरे

**मुखपृष्ठ**
अंबिका करंदीकर
संपर्क : ९८६०५०४५९१

**चित्रांकन :**
घनश्याम देशमुख, रेश्मा बर्वे, धनश्री केळकर,
राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, योगिता धोटे,
लोकेश कुलकर्णी, अमृता ढगे, राहुल पोतदार,
विनोद गायकवाड, माईंडईट संवाद, जैत्र डिजीटल


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| आपला महाराष्ट्र | दत्तात्रय जोशी | ०२ |
| कांद्याचे पीक | अश्विनी बर्वे | ०६ |
| किती किती छान | ज्ञानेश्वर गायके | ०९ |
| राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर | प्रा. प्रशांत शिरुडे | १० |
| माडापोफळीच्या बागेत | सुहास बारटक्के | १२ |
| छावा | राजन पोळ | १५ |
| चांगली अद्दल घडली | निर्मला देशपांडे | १६ |
| चला चित्र रंगवूया | रेश्मा बर्वे | १९ |
| आरोग्यसेवा आणि AI | अच्युत गोडबोले | २० |
| **अभिजात मराठी विभाग** | | |
| वेचू आनंदे | प्रवीण दवणे | २२ |
| ओळखा पाहू मी कोठे? | डॉ.नीलिमा गुंडी | २४ |
| माय मराठी | नीलिमा फाटक | २६ |
| गंमत शब्दांची | प्रा.विश्वास वसेकर | २८ |
| प्रश्नमंजुषा | उदय कदम | २९ |
| चित्रकोडे | घनश्याम देशमुख | ३० |
| चिंच | देविदास सौदागर | ३१ |
| घरच्याघरी रंगीत टी.व्ही. | नरेंद्र दाभाडे | ३२ |
| पंखा | अद्‌वैता उमराणीकर | ३५ |
| आंब्याच्या वनातील नाचरा मोर | ललिता सबनीस | ३६ |
| कुतूहल | वसुंधरा भोपळे | ३८ |
| **बालविभाग** | | |
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा : जादूगाराची सुटका | घनश्याम देशमुख | ४४ |
| जंतर मंतर बमचिक बम | डॉ. नरेंद्र खैरनार | ४६ |
| **ENGLISH SECTION** | | |
| The Sun Shine | Jitendra Raipure | ४७ |
| Happy Holidays: Fun, Learning and Growth | Dr. Sanjay Gaikwad | ४८ |
| Funny Puzzle | Ghanshyam Deshmukh | ५० |



ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/– मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.



**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे– ४११००४ संपादकीय : ०२०– २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०–२५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

विनम्र स्नेहाभिवादन !

आपल्या संपादनाखाली प्रसिद्ध झालेला 'किशोर' मासिकाचा फेब्रुवारी २०२५ चा अंक वाचला आणि मुखपृष्ठापासून अंतरंगातील आशयपूर्ण लेखांची नेमकी निवड भावली म्हणून हा पत्रसुसंवाद !

'माय मराठी' हे आपलं संपादकीय म्हणजे मराठी मायबोली विषयाच्या जिव्हाळ्याचा अर्कच होय. संदर्भसंपन्नता आणि सूचकता खूप महत्त्वाची वाटली.

अंतरंगातील लेख आणि चित्रांकन पाठ्यपुस्तकाची आवर्जून आठवण करून देते. ऐतिहासिक, भाषिक समृद्धी, काव्यविभाग आणि आधुनिक तंत्रज्ञान ए.आय.ची माहिती, चित्रकला, सामान्यज्ञान अशा कितीतरी विभागांचा अस्सल बौद्धिक खुराकच या अंकात आहे.

महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा-२' मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातल्या ९८ हजार शाळांमधून स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त असलेली आमची प्रभात किड्स स्कूल! यामध्ये सुसज्ज मराठी भाषा प्रयोगशाळा तर आहेच सोबत 'किशोर' मासिकाच्या वाचक विद्यार्थ्यांची संख्याही खूप आहे.

इयत्ता आठवीच्या मराठी सुलभभारती पाठ्यपुस्तकातील अकोल्याचे सुप्रसिद्ध कवी किशोर बळी यांची 'प्रभात' नावाची कविता, आमच्याच शाळेवर आहे आणि ती पहिल्यांदा 'किशोर' मासिकानेच प्रसिद्ध केली होती हे विशेष!

'किशोर' चा एक चांगला अंक प्रसिद्ध केल्याबद्दल आपले व सर्व सहकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन !

मराठी भाषेला केंद्र शासनाकडून अभिजात मराठी भाषेचा दर्जा बहाल झाल्यानंतर यंदाच्या 'मराठी भाषा गौरव दिना'च्या 'किशोर'ला मनापासून शुभेच्छा!

आपला स्नेहांकित,
**डॉ. गजानन नारे**
संचालक, प्रभात किड्स स्कूल, अकोला

# रंगीत सुगंधित सुट्टी

कधी एकदाची वार्षिक परीक्षा संपते आणि कधी आपल्याला हवीहवीशी उन्हाळ्याची सुट्टी मिळते याकडे तुम्ही डोळे लावून बसलेले असता ना ? परीक्षा संपत असतानाच रस्त्यावरच्या, घराशेजारच्या वा शेतातल्या आंब्याला, कडूनिंबाला आलेला सुगंधित मोहर तुम्हांला धुंद करत असतो. टप्पोरा फुललेला शुभ्र मोगरा, लालसर-जांभळा ताम्हण उर्फ जारूळ, गर्द केशरी पलाश म्हणजेच पळस, पिवळाधमक बहावा उर्फ अमलताश, जांभळा नीलमोहर म्हणजेच जॅकरेंडा, लालभडक पांगारा, फिका गुलाबी, जांभळट किंवा हिरवा पांढरा, दुधी करंज, गडद गुलाबी काटेसावर, गडद हिरवा वड-पिंपळ, हिरवट, पिवळ्या आणि जांभळ्या-निळ्या छटांचा अंजनी, पांढरा, पिवळा, सोनसळी चाफा आणि लालचुटूक, केशरी अशा राजस फुलांचा गुलमोहर हे सारे जण रणरणत्या उन्हात, वैशाख-वणव्यात आनंदाने रंगपंचमी, रंगोत्सव खेळताना तुम्ही पाहत असता. निरभ्र, अथांग, निळ्या आकाशाला पाठीशी घेत, सूर्याच्या वाढणाऱ्या उष्णतेला ताठ मानेने सामोरे जात, हे सगळे जण त्याला जणू आव्हान देत रसरसून-डवरून, मोहरून येत असतात. आभाळाला टांगलेले; उन्हात लखलखणारे झुंबरच जणू काही..त्यांच्यावर गर्द गुलाबी, पांढऱ्या, केशरी रंगाच्या फुलांच्या बोगनवेलीचा साज असतो. या साऱ्या रंगीबेरंगी झाडांखाली फुलांचे नि पाकळ्यांचे सडा-शिंपण सुरू होते आणि तुमची अवघी सुट्टी मखमली होऊन जाते. लाल-तांबडे, शेले-पागोटे उडवत जणू ही सारी झाडे तुमच्या सुट्टीचा, परीक्षा संपल्याचा आनंदोत्सव साजरा करत असतात. त्यात कोकीळ पक्ष्याच्या मंजूळ स्वरांनी आणि कावळा, चिमणी, कबुतर, होला, साळुंकी, बुलबुल, पारवा, दयाळ, सूर्यपक्षी आदींच्या उत्साही किलबिलाटाने अजूनच बहार येते. सर्वत्र फुलपाखरे आनंदाने बागडत असतात, पक्षी खिदळत असतात, जांभूळ पिकल्या झाडाच्या वरखाली इटुकल्या पिटुकल्या खारी खेळत असतात. भोरड्या म्हणजेच पळसमैना दुपारभर गप्पा ठोकत बसतात. जणू सारा निसर्गच तुमच्यासोबत आनंदाने सुट्टी साजरा करत असतो.

या वेळी घमघमणाऱ्या सुगंधित फुलांचा मोहर मनाला प्रसन्न करत असतो. मुक्तपणे सुगंधाची उधळण करीत गुलाब, निशिगंध, अबोली, चाफा, सदाफुली हवेला नवा तजेला देत असतात. सर्वच झाडावेलींच्या, पानाफुलांच्या बहरामधले ऊन डोळ्यांना सुखावून टाकते. डोळ्यांना थंडावा देणारी जाणीव सुखद वाटत असते. रणरणत्या उन्हातला गार पाण्याचा स्पर्श अंगावर शहारे आणतो. निसर्गासोबत असा नजरबंदीचा खेळ खेळता एक दिवस अचानक अवकाळी पावसाच्या शिडकाव्याने वातावरण अजूनच धुंद होते. हवेत मृद्गंधाचे अत्तर पसरायला लागते आणि हुरहूर लावत, या साऱ्या रंगीत-सुगंधित आठवणी जपत हळूहळू, अलगद पायांनी सुट्टी परतीचा प्रवास सुरू करते.

**किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक

# कांद्याचे पीक

अश्विनी बर्वे

बाबांनी उन्हाळी कांदा करायचा ठरवला होता. म्हणून त्यांनी घराजवळच थोडी जागा तयार केली. ''जा, बादलीभर पाणी घेऊन ये, आणि इथली माती ओली कर.'' बाबा म्हणाले. मला बाबांना मदत करायला फार आवडायची.

''आई, बाबांनी मोठ्या बादलीत पाणी आणायला सांगितले आहे.'' मला ज्या बादलीने पाणी न्यायचे होते त्या बादलीला आई मला हात लावू देत नसे. आई यावर काही सूचना देईल याची मला खात्रीच होती, मी कान टवकारून थांबलो होतो. तेवढ्यात ''अरे, आण लवकर'' बाबा म्हणाले आणि त्यांचा आवाज येताक्षणी मी मला हवी असलेली बादली पाण्याने भरून घेऊन गेलो. आम्ही ती जमीन ओली केली, आईने थोडी राख आणली आणि तिने मला तिथे चिखल करायला सांगितला. 'पण बादलीला मातीचे हात लावू नकोस, आणि चिखल अगदी चिकट नको करू पण कोरडाही नको.' हे गणित कसं जमवायचं हे मला कळत नव्हतं पण त्याकडे मी फारसं लक्ष दिलं नाही.



''आई, चिखलात पाय घालून नाचायला भारी वाटतं ना?'' मी म्हणालो. पण आईने ती नवीन बादली उचलली आणि विहिरीवर जाऊन धुतली. बाबांनीसुद्धा हात धुतले आणि ते आईला म्हणाले की, ''मी दुकानातून कांद्याचे बी घेऊन येतो. मागच्या वर्षी आपण बी पेरले नाही, आता विकतच आणावे लागेल.''

''मी जाऊन आणू का? सुनील काकाच्या दुकानातूनच आणायचं आहे ना?''

''हो, तू सायकल घेऊन जा, तोपर्यंत मी थोडे काम करून येतो.'' बाबा म्हणाले आणि त्यांनी मला सायकल नीट चालव असा सल्लासुद्धा दिला नाही. मला वाटले, कांद्याचे बी एकदम स्वस्त असेल, कारण मी रोज कांदा हाताने फोडून खातो तेव्हा मला त्यात काहीच विशेष वाटत नाही.

''तीन हजार रुपये किलो आहे, तुला किती पाहिजे?'' दुकानदाराने विचारले. सुनीलकाका दुकानात असला की तो एकदम दुकानदारांसारखा बोलतो.

''दोन किलो सांगितले आहे. बाबा नंतर पैसे आणून देतील.'' मी म्हणालो.

त्याने कांद्याच्या बियांची पिशवी मला सायकलला लावून दिली. बी घरी नेताना मी एकदम मोठा झालो असे मला वाटले. कांद्याचे बी एकदम चिमुकले असते, मोहरीच्या दाण्यासारखे. आईने ते घेतले आणि स्वच्छ आहे की नाही ते बघितले. मग तिने आम्ही केलेल्या चिखलात ते बी पेरले म्हणजे तिने अंदाजाने टाकले. तिला हवे तिथे बी बरोबर पडत होते. तिच्या हातातले ते कौशल्य बघून मीही करून पाहिले.

''अरे, हात नीट समोर धर आणि नजर स्थिर ठेव म्हणजे बी कुठे पडते आहे हे तुला कळेल.'' आई म्हणाली.

''किती दिवस लागतील कांदे यायला?'' मी विचारले.

''अरे, याचे रोप होईल मग ते दुसरीकडे नेऊन लावायचे.'' बाबा मागून येत म्हणाले.

''म्हणजे कधी?''

''त्यांना चांगल्या बोटभर शिंग्या आल्यावर...'' आई म्हणाली,

''खरंच त्यांना शिंगं येतात?'' मला ती कशी येतात हे बघण्याची इच्छा होती.

दुसऱ्या दिवशी मला शाळा होती आणि घरी आल्यावर मला गाईला पाणी दाखवायचे होते, चारा घालायचा होता. शिवाय गोठ्यातले शेण उचलून आई जिथे गोवऱ्या लावते तिथे नेऊन ठेवायचे होते. माझी बहीण ही सगळी कामे करायला खूप लहान होती. त्यामुळे मला बाबांच्या मदतीला जावे लागे. काही दिवसांनी कांद्याच्या बिया जिथे पेरल्या होत्या तिथे छोटे छोटे हिरवे कोंब दिसू लागले.

''नीट खाली वाकून बघ, सगळ्या बिया उगवल्या आहेत का?'' बाबा म्हणाले. मी नीट खाली वाकून बघितले तर जवळपास सगळ्या बियांमधून हिरवे कोंब आले होते.

''बाबा, शिंगं कुठे आहेत?''

''अरे अजून थोडे दिवस गेले की दिसतील, पण त्यांना शिंग्या म्हणतात.'' बाबा म्हणाले.

थोड्या दिवसांनी बोट बोट कांद्याची पात दिसू लागली. त्यांना शिंग्या का म्हणतात हे मला कळले. बाबा मला घेऊन शेतात गेले. त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवून मला जवळ ओढून घेत म्हटले, ''तुला जमीन चांगली नांगरली गेली आहे असे वाटते आहे का?''

मला काय उत्तर द्यावे काहीच कळत नव्हते. बाबांचा खांद्यावरचा हात निघू नये एवढेच मला वाटत होते. मी त्यांच्याकडे बघून 'हो' एवढेच म्हणालो. मग बाबांनी कांद्यासाठी जमीन लावून घेतली म्हणजे कांद्याचे रोप लावल्यानंतर सगळ्या रोपांना पाणी मिळावे यासाठी ती बांधावी लागते. मग आईने, बाबांनी आणि त्यांच्या मित्राने मिळून रोपं लावायला सुरुवात केली. मीपण थोडी थोडी मदत केली पण उकिडवे बसून रोप लावताना पाय खूप दुखू लागले. म्हणून मी अधूनमधून उठत होतो. कांद्याची रोपं लावताना आम्ही सगळे खूश होतो. बाबा आईला म्हणाले, ''या वर्षी कांद्याला चांगला भाव मिळाला तर पोरांना चांगले कपडे घेऊ, शाळेसाठी नवीन ड्रेससुद्धा घेऊ.''

आम्हांला सगळ्यांना नवीन वस्तू मिळतील हे ऐकून मला खूप आनंद झाला, त्या आनंदात मी माझ्या बहिणीच्या कानात कुर्रर केले तर ती टाळ्या वाजवून हसू लागली. आमचं हसू बघून आई आणि बाबासुद्धा हसले. कांदे जमिनीखाली चांगले वाढत आहेत की नाही हे बघण्यासाठी बाबा मला शेतावर घेऊन जात, आणि माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणत, ''या वर्षी चांगलं पीक येईल, तुला काय वाटतं?'' बाबा मला असं



विचारत तेव्हा मी फक्त त्यांच्याकडे बघत बसे. त्यांचा खांद्यावरचा हात कधीच निघू नये असे वाटे. असे साडेतीन चार महिने गेले. कांद्याचे भरघोस पीक आले.

''चला कांदे काढायला,'' बाबा मला म्हणाले. आई आणि मी बाबांबरोबर गेलो. तिथे आईच्या दोन मैत्रिणीही आल्या होत्या. त्या उक्तं घेऊन कांदे काढत. आम्हीपण त्यांना मदत करत होतो.

''या वेळचा कांदा चांगला मोठा आहे आणि लालसुद्धा,'' बाबा आईला आणि मला म्हणाले. आईच्या चेहऱ्यावर खूप आनंद होता. आम्ही सगळ्या कांद्यांचा एका ठिकाणी ढीग करून ठेवला. नंतर तो चाळीत हलवला. कांद्याचा वरचा खराब झालेला पापुद्रा काढून टाकला. त्याला कांदे चाळणे म्हणतात ते केले. मग एक दिवस बाबांनी ट्रॅक्टरमध्ये कांदे भरले आणि ते मार्केटला घेऊन गेले. ते पहाटे जाऊन पोहोचले पण त्यांच्याआधी खूप मोठी रांग होती. पण सगळे जण नाराज होते कारण कांद्याला चांगला भाव नव्हता. बाबांनी नेला तेवढा कांदा विकला.

बाबा घरी आल्यानंतर आई म्हणाली, ''अहो, काही काळजी करू नका, पुढच्या वेळेला नक्की भाव मिळेल.'' तिने परत कांद्याचा रस्सा करायला घेतला.

''मुलांना ड्रेस शिवता येणार नाही, कांद्याच्या बियाचे पैसे आणि इतर खर्च निघाला तरी खूप आहे.'' बाबा आईला हळू आवाजात म्हणाले.

''मी उद्यापासून शेजारच्या वाडीवर कामाला जातो.''

मी सकाळी उठण्याच्या आत बाबा सायकलवर टांग टाकून निघून गेले होते. मी परत माझ्या कामाला लागलो. रोज कांद्याची चाळण करायची, सुनील काकाला कांद्याचा भाव विचारायचा.

''अरे, चल चल लवकर, ताडपत्री धर'' आई म्हणाली.

''अगं मला दप्तर तर ठेवू दे घरात,'' मी म्हणालो.

''पाऊस भरून आला आहे, असा अवेळी येणारा पाऊस नेहमी घात करतो.'' आईची बडबड सुरू झाली. तिच्या डोळ्यांतून येणारे पाणी कमी होते जणू म्हणून पाऊस आला. माझ्या मनात आले.

कांदा कितीही झाकून ठेवला तरी कांद्याला मोड यायला लागले होते. त्याचा वास सगळीकडे सुटला होता. आई आणि मी एक एक कांदा नीट बघून बाजूला काढत होतो पण त्यातून फारसे काहीच हाती येत नव्हते.

शेवटी महिन्याने बाबांनी सडके कांदे गोणीत भरले आणि गावाच्या टेकडीकडे घेऊन गेले. तेवढे सगळे कांदे आम्हांला फेकून द्यावे लागले. आईच्या डोळ्यांत पाणी होते. तरीही ती पदर खोचून कामाला लागली.

''काळजी करू नकोस; पुढच्या वेळी आपल्याला नक्की भाव मिळेल,'' बाबा माझ्याकडे बघत म्हणाले. ''मग तुला आपण नवीन कपडे शिवू, काय?'' मी हसून त्यांच्याकडे बघितले.

मला तर माझी भेट मिळाली होती, त्यांनी माझ्या खांद्यावर ठेवलेला हात आणि त्याची ऊब मला अजूनही जाणवत होती. त्यांनी दिलेल्या हिमतीला पीक भरघोस आले होते.

संपर्क : ९९२२७६४१४१

# किती किती छान..

ज्ञानेश्वर गायके

किती किती छान देवा, किती किती छान
निळं निळं आकाश अन् हिरवं हिरवं रान

निळ्या निळ्या आकाशात, चांदण्यांचा सडा
धरतीच्या हातामध्ये, हिरवा हिरवा चुडा
पर्वताच्या कानी शीळ, घालतोय वारा
सागराच्या कुशीमध्ये, दडलाय हिरा

देवा तुझा लई मोठा, इथं बारदाना
पाखरांच्या चोचीमध्ये, भरवतो दाणा
मिरगाच्या पावसाने, केली आबादानी
रानपाखरांच्या ओठी, पहाटेची गाणी

देवा तुझ्या डोंगरात, झुळझुळ झरा
त्याच्या मागेपुढे पिंगा, घालतोय वारा
चांदण्याच्या परसात, तारकांची माळ
रोज जन्मते पूर्वेला, सोनेरी सकाळ

संपर्क : ९४०३३८४८८९



# राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

प्रा. प्रशांत शिरुडे



अहिल्याबाई होळकर म्हणजे तुम्हां आम्हां सर्वांच्या मनात असणारी ती प्रतिमा की ज्यात सात्त्विकता, सुशीलता, शीतलता, पवित्रता, पुण्याई, चारित्र्यसंपन्नता, धर्मपरायणता ओतप्रोत भरलेली आहे. निस्सीम शिवभक्तीने, हातात शंकराची पिंड घेतलेली; जिच्या डोईवरचा पदर कधी ढळला नाही आणि काळजातला धीर कधी खचला नाही.

अशा या अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ अहमदनगर जिल्ह्यात चौंडी या गावी झाला. वडील माणकोजी शिंदे तर आई सुशीलाबाई. गावातील ते एक सुसंस्कृत कुटुंब होते. श्रीमंत पेशवे थोरल्या बाजीरावांच्या पुढाकाराने इ.स. १७३३ मध्ये अहिल्या आणि खंडेराव यांचा विवाह थाटामाटात पार पडला. पुढे सासरे मल्हारराव होळकरांनी अहिल्येची बुद्धिमत्ता, गुणवत्ता पाहून आपल्या मुलाच्या बरोबरीने सुनेलाही राज्य कसे चालवावे, घोडा कसा फेकावा, तलवार कशी चालवावी, तोफखाना कसा वापरावा, न्यायनिवाडा कसा करावा, लोकांना मदत कशी करावी, माणसे कशी पारखावीत, गनिमीकावा कसा करावा, धनुष्यबाण कसा चालवावा, भात्यामध्ये बाण कसे भरावेत यांसारख्या अनेक गोष्टींचे शिक्षण दिले. इसवी सन १७५४ मध्ये कुंभेरीच्या वेढ्यात खंडेराव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्या वेळी अहिल्याबाईंना दोन मुलं होती. त्या सती जायला निघाल्या. पण सासऱ्यांच्या आग्रहाने त्या सती गेल्या नाहीत. पुढे काळाच्या ओघात सासुबाई गौतमीबाई, इ. स. १७६६ मध्ये सासरे मल्हारराव, मुलगा भालेराव व नातू नाथोबा, जावई यशवंतराव फणसे यांचे निधन झाले. मुलगी मुक्ता सती गेली. वैयक्तिक आयुष्य प्रचंड दुःखाचे असले, तरी तब्बल २९ वर्षे अहिल्याबाईंनी रयतेचे अश्रू पुसत एकहाती राज्य केले. ही त्या वेळच्या कालखंडात आणि पुरुषप्रधान व्यवस्थेत साधी आणि सोपी गोष्ट नव्हती. दुःखाचे डोंगर समोर असतानाही रघुनाथराव पेशवे याचे आक्रमण अहिल्याबाईंनी मोठ्या चतुराईने परतवून लावले.' मी हरली तर फारसा फरक पडणार नाही, पण आपण मराठी सत्तेचे अटकेपार झेंडे गाडणारे बाईकडून पराभूत झालात तर तुमची सर्वत्र अपकीर्ती, अवहेलना आणि कुचेष्टा होईल' यातील राजकारण रघुनाथरावांच्या लक्षात येताच त्यांनी सैन्याला माघारी पाठवले व 'मी युद्धाला नाही तर आपल्यावर आलेल्या दुःखाच्या सांत्वनाला येत आहे' असा निरोप पाठवला.

हे सर्व जरी असले तरी, आज तुम्हां आम्हां सर्वांना अहिल्याबाई आठवतात त्या त्यांच्या सामाजिक कार्यामुळे. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि बंगालच्या उपसागरापासून अरबी समुद्रापर्यंत अखंड भारतामध्ये अहिल्याबाईंनी केलेल्या कार्याचे दाखले मिळतात. ठिकठिकाणी विहिरी, घाट, मठ, मंदिरे, पाणपोया, अन्नछत्रे, धर्मशाळा, संस्कार वर्ग, आश्रमशाळा, ग्रंथागार, यज्ञशाळा, तलाव हे सर्व लोकांच्या सोयी सुविधेसाठीच बांधलेले दिसतात. याशिवाय अनेक जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धारही त्यांनी केला. अहिल्याबाईंच्या या धोरणाचा परिणाम म्हणूनच माळवा प्रांतात शांतता, स्थैर्य, व्यापार, उद्योगधंद्यांचा विकास झाला. अहिल्याबाईंनी शेतीला प्राधान्य दिल्याने हा प्रदेश हिरवागार झाला. शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक ते सर्व बी-बियाणे व साहित्य त्यांनी उपलब्ध करून दिले. धनसंपत्ती दिली नाही. पण कोणी उपाशी राहणार नाही याचीही काळजी घेतली. थोडक्यात अहिल्याबाईंनी छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच प्रजाहितदक्षतेने राज्य केले. देशभर रस्ते बांधले. कलकत्ता ते काशी असा हमरस्ता तयार केला. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली. जगाला वंदनीय होईल असे कार्य केले. यातूनच असंख्य लोकांना रोजगार मिळाला. देशभरातील प्रतिभासंपन्न कारागिरांना महेश्वरीत आमंत्रित केले. महेश्वरी साडी उद्योग निर्मितीचे व विविध उद्योगाचे केंद्र बनले. विविध कलांना उत्तेजन दिले.

अहिल्यादेवींची राहणी अतिशय साधी होती. महेश्वरीत एका घोंगडीवर बसून त्या राज्यकारभार करीत. कोणत्याही प्रकारचा ऐषारामी डामडौल नव्हता. ही कामे करताना त्यांनी कधीही दौलतीचा म्हणजे सरकारचा पैसा वापरला नाही. सर्व खर्च हा होळकरांच्या खाजगीतील संपत्तीतून झालेला असे.

रोज पहाटे पाच वाजल्यापासून त्यांच्या कामाला सुरुवात होई तर संध्याकाळी उशिरापर्यंत कामे सुरू असत. या ३०० व्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आपण त्यांचा इतिहास जाणून घेतला पाहिजे व अंगीकारला पाहिजे.

**संपर्क : ९९६७८१७८७६**




# माडापोफळीच्या बागेत

सुहास बारटक्के

''नील चल, आज आपण देवकरकाकांच्या बागेत जाऊ. काका आपल्याला कधीच रागवत नाहीत. माडाखाली पडलेले नारळ आम्ही गोळा करून त्याना नेऊन देतो ना?'' ''माडाखाली?''

''चल तुला दाखवतो.''

दोघं देवकरकाकांच्या बागेत पोचले तेव्हा धप्‌दिशी आवाज झाला व एक नारळ त्यांच्या पुढ्यातच पडला. ''जरा जपून रे. नारळ सहसा डोक्यात पडत नाही. पण पडला तर आपला नारळ फुटायचा.'' असं म्हणून बाबूल आणि नील नारळ सुपारीच्या बागेत असलेल्या मधल्या अरुंद पायवाटेनं चालू लागले. देवकरकाकांच्या घरापासून ते थेट

## वेंगुर्ला रॉक्सचे रहस्य

समुद्रापर्यंत सरळ गेलेल्या त्या पायवाटेच्या उजव्या बाजूला नारळाची उंच झाडं होती तर डाव्या बाजूला हिरवीगार दिसणारी सुपारीची झाडं होती.

''हे बघ माड. नारळाच्या झाडाला 'माड' असं म्हणतात. आणि सुपारीच्या झाडाला 'पोफळ' असं म्हणतात. या माडापोफळीच्या बागा वर्षानुवर्षे उत्पन्न देतात. दोन्ही झाडांचं खोड बघ सरळ उंच आहे आणि वरच्या भागाता फळं लागली आहेत. ही उंचावरची फळं काढणं तसं अवघड असतं. पण त्यासाठी कसलेले कामगार तयार असतात. ते तुम्हांला फळं काढून देतात. पण दररोज नव्हे दर पंधरा वीस दिवसांनी किंवा महिन्या–दोन महिन्यांनी. नारळ पोपटी किंवा करड्या रंगाचे झाले की ते तयार झाले. मग ते पाडायचे किंवा खूपच दिवस झाडावर राहिले की ते आपोआप खाली पडतात. त्यासाठी मालक बागेतून दररोज फेरफटका मारतो. पडलेले ४–५ नारळ सापडले तरी त्या दिवशीचा त्यांचा खर्च भागला. नाहीतर मग कामगाराला बोलावून नारळ पाडून घ्यायचे व गोणीत भरून दुकानदारांना विकायचे. नारळाच्या झाडाला दिवसाकाठी एकदा रहाटाचे पाणी दिले की झालं. वर्षानुवर्षं नव्हे पिढ्यान् पिढ्या या बागा मालकांना भरपूर उत्पन्न मिळवू देतात.''

''आणि पोफळी?''

''पोफळीचं झाड नारळाप्रमाणे जाड व मजबूत नसतं. वरची पानं म्हणजे झावळ्या असतात ना, त्याच्या खाली फळांचे ढीग लोंबत असतात. ही फळं पिवळी झाली की पाडतात व वाळवतात. वरचं आवरण काढलं की आत सुपारी मिळते.''

''सुपारीला पण भरपूर दर असतो रे पुण्यात.''

''हो ना, म्हणूनच कोकण श्रीमंत आहे असं म्हणतात ना?''

त्यांची चर्चा चालू असतानाच पलीकडच्या बागेतून धपाधप आवाज येऊ लागले. बाबूल व नील तिकडे मधल्या कुंपणापर्यंत धावले तर पलीकडच्या बागेतल्या उंचच उंच बाणावली जातीच्या नारळाच्या झाडावर एक माणूस नारळ पाडण्याकरता चढत असल्याचे त्यांना दिसलं. त्याचं नारळावर उंच चढण्याचं कसब वाखणण्यासारखं होतं. पायाला गोल दोरी बांधली होती. चवड्याजवळ दोरी अडकवून तो दोन्ही पाय मजबूतपणे झाडावर ठेवत होता. आपल्या दोन्ही हातांत झाडाचे खोड पकडून तो हातापायाचा वापर करून भराभर वर जात होता. नारळाच्या झाडाच्या शेंड्यावर जाताच त्यानं नारळाच्या झावळ्या पकडल्या. दोन फांद्यांच्या मधून तो अलगद वर गेला व तिथं असणारे नारळ पाडू लागला. नीलनं आश्चर्यानं विचारलं ''बापरे किती उंच गेलाय तो? आणि एवढ्या उंचीवरून नारळ खाली टाकताना नारळ फुटत नाही का?''

''नाही. नारळावर जे आवरण असतं ना, ते खूप जाड असतं. त्याच्या आत नारळ अगदी सुरक्षित असतो.''

काही नारळ पाडून झाल्यावर तो माणूस आता पोफळीच्या म्हणजे सुपारीच्या झाडांवर सरसर चढला. ''सुपारीची झाडं अगदी जवळ जवळ लावलेली असतात. त्यामुळे एकदा एका झाडावर चढलं की पुन्हा उतरायची गरज नसते.'' माकडाप्रमाणं तो माणूस आता एका झाडावरून दुसऱ्या झाडाकडे वरच्यावर भ्रमंती करत होता. ते दृश्य पाहून नीलला खूपच मजा वाटली आणि त्या माणसाचं कौतुकही वाटलं. ''एका पोफळीला हेलकावे देत दुसऱ्या पोफळीच्या (झाडाला) जवळ जायचं. मग आधीच्या झाडाचा हात सोडून दुसऱ्या झाडाला पकडायचं. मग शरीर अलगद दुसऱ्या झाडाकडे घ्यायचं. प्रत्येक झाडावरची पिवळी–केशरी फळं काढून खाली टाकायची. फळं खूप लहान असल्यानं आख्खा घोसच कमरेला लटकवलेल्या कोयत्यानं तोडून खाली फेकून द्यायचा. निसर्गानंच या फळावरचं आवरण मजबूत केलंय. उंचावरून पडूनही फळं खराब होत नाहीत ती फळं म्हणजे नारळ आणि सुपारी.'' बाबूल सांगत होता.

बाबूल आणि नीलनी पाहिलं की सगळ्या बागांची रचना अगदी सारखी असते. बागेत खालपर्यंत पाण्याचा पाट बांधलेला असतो. विहिरीतलं पाणी, रहाटाने

अथवा पंपाद्वारे या पाटात येतं. हा पाण्याचा पाट जागोजागी बंद करण्याची व उघडण्याची सोय असते. तासाभरात सगळी बाग शिंपून होते. खूप छान अशी ही पाणीपुरवण्याची पारंपरिक रचना.

''तुला ठाऊकाय पूर्वी हे रहाट फिरवण्यासाठी रहाटाला बैल बांधायचे. बैलाच्या डोळ्यांना झापडं बांधून त्याला रहाटाला बांधून गोल गोल फिरवायचे. गोल रहाट एका लयीत फिरायचे व रहाटावर बांधलेल्या मडक्यांतून विहिरीचं पाणी वर यायचं. ते या दगडी पाटाद्वारे सगळ्या बागेत जायचं. आता अगदी कमी ठिकाणी असे रहाट बघायला मिळतात.'' बाबूलनं माहिती सांगितल्यावर नील रहाटाचीच कल्पना करू लागला.

''रहाटगाडगं, हा शब्द त्यावरूनच आलाय हे मला आत्ता कळलं बाबूल'' नीलला खूपच मजा वाटली. मग दोघेही पुन्हा समुद्राकडे निघाले.



''....काल आपण खेकडे पकडले ना? त्यातले काळ्या पाठीचे खेकडे कधीकधी नारळावर पण चढतात बरं का. आपल्या अणकुचीदार हातांनी नारळाला भोक पाडून आतील खोबरं खातात. आणि एखादं जुनं नारळाचं झाड असेल ना, तर त्या नारळाच्या झाडाच्या खोडात भोकं पाडून रहातात सुद्धा.''

''बापरे हे म्हणजे भलतंच आश्चर्य आहे.'' नील म्हणाला, ''अरे हेच काय, हा पुढे पाण्याचा प्रवाह दिसतोय ना समुद्राच्या बाजूला, त्यावर काही ठिकाणी छोटी छोटी मारंडीची झुडपं आहेत. त्या झुडपांवरही खेकडे रहातात. समुद्राला भरती आली की या प्रवाहातलं पाणी वाढतं. या प्रवाहांना इकडे खोडदा असं म्हणतात. समुद्राचं जादा येणारं पाणी या खोडद्यांमधून वहातं. पाणी वाढलं की या खोडद्याची पातळी वर जाते. मग प्रवाहाबरोबर वाहत आलेले खेकडे या झाडांचा आधार घेऊन झाडांवरच थांबतात. काही वेळानं पाण्याची पातळी ओहोटीसोबत कमी कमी होत जाते व हे खेकडे त्या खोडा मधल्या झुडूपांवरच अडकतात... पुन्हा भरती येण्याची वाट पाहत. त्यांना झाडांवर खाद्य मिळाले की इथेही रहातात. पण असे खेकडे फार मोठे नसतात. खरं तर ती छोटी छोटी खेकड्यांची पिल्लंच असतात.''

''चलं, जाऊया का आपण पहायला?'' ''आज नको उशीर झालाय. उद्या तुला खोडदा आणि होरं दाखवतो.''

''होरं?''

''तीच तर मोठी गंमत आहे. दाखवतो उद्या.''

बाबूल म्हणाला व दोघे घराकडे निघाले.

(क्रमशः)

**संपर्क : ९४२३२९५३२९**

# छावा

राजन पोळ



झाला, जन्म झाला; बाळराजं जन्मलं
सईराणींच्या कुशीत धाकलं धनी हासलं
आऊ जिजाऊंनी नाव शंभूबाळ ठेवलं
शिवपुत्राचं कोडकौतुक साऱ्या रयतेनं केलं
गड पुरंदर कसा गेला नटून थटून
सनई चौघडे वाजती दिंडी दरवाज्यांतून
गडावरली मंडळी गेली सारी हरखून
हत्ती चौफेर फिरती गोड साखऱ्या वाटून
राणू आता मोठी झालीय अक्काताई
शंभूबाळ कडेवरी सारखे हसत राही
हरवले लवकरी छत्र सई आईचे
दूधआई धाराऊने संगोपन केले शंभूचे
सवंगडी रोज येती, होते तलवारबाजी
शंभूबाळाच्या सरावाला हजर राजे शिवाजी
झाले शंभू तरबेज, शिकले गनिमीकावा
झुंझार त्या मावळ्यांचा होता जिवलग छावा
लग्न जाहले शंभूचे रंगला असा सोहळा
येसु झाली युवराज्ञी गळ्यात फुलांच्या माळा
नाही डगमगले कधी, गेले थेट आग्र्यास
आबासाहेबांच्या संगे भिडले त्या औरंग्यास
थांबले मथुरेस तेव्हा झाले पंडित ज्ञानी
शिकल्या विविध भाषा झाली समृद्ध वाणी
चौदाव्या वर्षी लिहिला, संस्कृत ग्रंथ बुधभूषण
महाकवी जाहले राजे, त्यांच्या लेखणीला वंदन
अजिंक्य शंभूराजे झाले दुसरे छत्रपती
बातमी गेली आग्र्याला दडपली औरंग्याची छाती
हुतात्मा झाले शंभूराजे, झाले अजरामर
धर्मनिष्ठ स्वराज्य रक्षक कीर्ती भारतभर

संपर्क : ८५९११२११७२

# चांगली अद्दल घडली

निर्मला देशपांडे

एक खूप मोठे, घनदाट जंगल होते. त्यात वाघ, सिंह, कोल्हे, लांडगे, ससे आणि माकडे असे अनेक प्राणी राहत होते. त्यात एक भले मोठ्ठं अस्वल राहत होते. भारी द्वाड होते ते!

झाडावर चढून ते पक्ष्यांच्या घरट्यातली अंडी खायचे, पक्ष्यांच्या पिलांना घाबरवायचे. खारूताईला सुद्धा भीती दाखवत जोरात पळायला लावायचे. आणि मग सगळे घाबरले की खो खो हसत, दणदण पाय आपटत चालायला लागायचे. चालताना जमिनीवरून सरपटणारा छोटा प्राणी, जीवजंतू पायाखाली मुद्दाम तुडवायचे. अस्वलांना मध फार आवडतो. हे अस्वलही झाडावर चढून मधमाश्यांच्या पोळ्यातला मध, मेण, त्यांची अंडी सगळं सगळं खाऊन टाकूनच खाली उतरायचे. बिचाऱ्या मधमाश्या. खूप कष्ट करून त्यांनी मिळवलेल्या मधावर हा ऐतोबा डल्ला मारायचा. शिवाय त्यांचे घर म्हणजे पोळेही नष्ट करून टाकायचा. त्यांना खूप राग





यायचा. पण त्या दुष्ट अस्वलाचा बंदोबस्त कसा करायचा हे काही कुणालाच समजत नव्हते. त्यामुळे त्याचा उद्धटपणा दिवसेंदिवस वाढतच चालला होता. आता तर तो येऊ लागला की खारूताई सरसर झाडावर उंच चढून बसत. ससे पटापटा आपल्या बिळात जाऊन लपून बसत. अगदी हरणं, सांबरंसुद्धा दूर पळून जात. माकड मंडळी झाडांच्या शेंड्यावर चढून ओरडून सर्वांना अस्वल आल्याची वर्दी देत. अशा तऱ्हेने त्याने जंगलात उच्छाद मांडला होता. सगळ्या प्राण्यांना सळो की पळो करून सोडलं होते.

एकदा ते अस्वल असंच दणादणा पाय टाकत, जमीन तुडवत चाललं होतं. त्याच्या रस्त्यात एक मोठं थोरलं मुंग्यांचे वारूळ होते. खूप मुंग्या त्या वारुळाच्या परिसरात वावरत होत्या. आपले काम करीत होत्या. खरं तर अस्वल त्यांना त्रास न देता बाजूने जाऊ शकत होतं. पण हा दांडगोबा! त्याला आनंद झाला आणि तो तिथून मुद्दाम जाऊ लागला. तशा कितीतरी मुंग्या त्याच्या पायाखाली चिरडू लागल्या तेव्हा एक मुंगी धाडस करून त्याच्या पायावरून त्याच्या कानापर्यंत चढली आणि त्याला म्हणाली, ''अस्वलदादा, का रे आम्हांला चिरडतोस.'' आम्ही कधीही तुला काहीही त्रास देत नाही. मग, ''ए दादा कुणाला म्हणतेस गं? मी काही तुमचा दादाबिदा नाही. आणि हा जंगलातला रस्ता आहे. मी त्या रस्त्यावरून चाललोय.'' कान झटकत अस्वल म्हणाले, ''हं, चल चालती हो माझ्या कानावरून, जास्त शहाणपणा शिकवू नकोस मला. हूं..'' आता मात्र मुंगी चिडली. त्याच्या कानाला कडकडून चावत ती म्हणाली. ''किती दुष्ट–वाईट आहेस तू. सगळ्या जंगलाला पीडा आहेस अगदी. काय रे स्वतःला जंगलाचा राजा समजतोस की काय तू? पण हे बघ, तुलाही कुणीतरी भेटेलच, शेराला सव्वाशेर...'' हे ऐकून तर अस्वल आणखी संतापले. त्याने वारुळावरच हल्ला केला. आपल्या धारदार नखांनी त्याने ते उकरले. मग त्याच्या वर थयथय नाचून ते भुईसपाट केले आणि मग दणादणा पाय आपटीत ते तिथून निघून गेले.

त्याच्या हल्ल्यातून बचावलेल्या मुंग्या मग एकत्र आल्या. त्यांनी पुन्हा दुसऱ्या सुरक्षित जागेत वारूळ बांधले. अस्वलाला धडा शिकवण्याचे मात्र त्यांनी ठरवले. मुंग्याच्या वारुळावर हल्ला करून अस्वलाने पुढे जाऊन एका झाडावरचे मधमाश्यांचे पोळे पळवले व मोठ्या खुशीत ते मध खात झाडाखाली बसले. हे एका खारूताईने पाहिले व ते मुंग्यांना येऊन सांगितले. अस्वलाने आरडाओरडा करीत मुंग्यांचे वारूळ नष्ट केलेले साऱ्या जंगलाने पाहिले होते. खारूताईला हे पाहून खूप वाईट वाटले होते आणि त्यांना अस्वलाचा बंदोबस्त करण्यासाठी मदत करायची हेही तिने ठरवले होते.

दुसऱ्या दिवशी एका मधमाशीची आणि मुंगीची गाठ पडली, मधमाशीने वारूळ अस्वलाने नष्ट केलेले पाहिले होते. तिने त्याबद्दल मुंगीजवळ दुःख व्यक्त केले आणि म्हणाली, ''तुमचं घर त्या दुष्टाने मोडले. आता खरं म्हणजे आपण सर्वांनी मिळून त्या दांडगोबाला चांगली शिक्षा केली पाहिजे आणि जंगलातून दूर हाकलून दिले पाहिजे. सगळ्यांनाच छळतोय हा राक्षस. अगं, आमच्या पोळ्यातलासुद्धा मध, मेण खाऊन ते मोडून टाकतो

हा.'' ''हो ना,'' मुंगी म्हणाली, ''पण आपण एवढे छोटे प्राणी, आपण काय करणार?'' मधमाशी म्हणाली. त्यावर मुंगी म्हणाली, ''तुम्ही आणि आम्ही एकत्र आलो तर नक्कीच काहीतरी उपाय सुचेल. तू तुमच्या मधुराणीसाहेबांना घेऊन आमच्या राणीसाहेबांना भेटायला ये. म्हणजे त्या दोघी विचारविनिमय करून काहीतरी उपाय नक्की शोधतील.'' ''चालेल...'' मधमाशी म्हणाली आणि दुसऱ्या दिवशी तिच्याकडे आली.

त्या दोघींचे मुंग्यांनी झकास स्वागत केलं. नंतर दोन्ही राण्यांची खलबत झाली. त्यानुसार अस्वलाच्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावर एका झाडाखाली हजारो मुंग्या माती उकरून जमीन पोकळ करत होत्या. तर अनेक मधमाश्या त्याच झाडावर, अगदी हाताशीच एक मधाचे मोठे पोळे बांधत होत्या. लवकरच त्यांचे काम पूर्ण झाले. पोळेही मधाने लदबदले. आता मात्र मुंग्या तिथून दूर जाऊन बसल्या तर मधमाश्या एका मोठ्या फुलाच्या झाडावर जाऊन बसल्या. अस्वलाची फजिती पाहायला त्या अगदी उत्सुक झाल्या होत्या.

नेहमीप्रमाणे अस्वल दाणदाण पावले टाकत अगदी मजेत येऊ लागले. त्याबरोबर उंच झाडांवर बसलेल्या माकडांनी अस्वल येत असल्याचा इशारा केला. सगळे एकदम सावध झाले. अस्वल आले. दुरूनच त्याने ते मधाने लदबदलेले पोळे पाहिले. त्यातून मध टपकत होता. ते पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले आणि मागचा पुढचा विचार न करता जोरात धावत सुटले. मध खाण्यासाठी त्याने तोंड वर केले आणि आणि... ते गपकन गुडघ्यापर्यंत त्या पोकळ मातीत फसले. पाय वर काढण्यासाठी जेवढा जोर ते लावू लागले तेवढे अधिकच ते खोल जाऊ लागले.

एवढ्यात त्याच्या डोक्यावर छोटे छोटे नारळ पडू लागले आणि असंख्य मधमाश्यांनी त्याच्यावर हल्ला केला. त्याच्या केसाळ अंगात खोल घुसून त्या मधमाश्या कडाडून अस्वलाला चावत होत्या. तर जवळच्या नारळाच्या झाडावरून माकडे नारळ फेकून मारत होती. आता मात्र अस्वल घायाळ झाले होते. ते मोठमोठ्याने ओरडू लागले. ही बातमी जंगलात सगळीकडे पसरली. सगळ्या जंगलालाच वैताग आणणाऱ्या अस्वलाला झालेली शिक्षा पहायला, त्याची फजिती बघायला अवघे जंगल जमा झाले. ते सगळे टाळ्या वाजवू लागले, शिट्ट्या वाजवू लागले आणि अस्वल आणखी चिडून ओरडाआरडा करू लागले, पण मातीत रुतलेल्या त्या दुष्टाला बाहेर येता येईना.

''काय रे जंगलाच्या राजा. काय रे ही तुझी अवस्था. आम्ही कष्टाने जमवलेला मध खातोस? सगळ्या जंगलाला छळतोस... मुंग्यांना चिरडून टाकतोस? आता भोग त्याची फळे.'' मधुराणी त्याला म्हणाली.

''मला क्षमा करा. मी पुन्हा असे वागणार नाही. पण माझी इथून सुटका करा.'' अस्वल गयावया करत म्हणाले.

तेव्हा सर्वानुमते त्याची सुटका करण्याचे ठरले. वेलींचा एक जाडजूड दोर त्याच्याकडे टाकण्यात आला. त्याने तो हाताने घट्ट पकडला. मग सगळ्यांनी मिळून तो हलके हलके ओढला आणि अस्वलाला खड्ड्यातून बाहेर काढले.

त्यानंतर मात्र अस्वल शहाणे झाले. त्याने दुष्टपणा सोडला, ते सर्वांशी चांगले वागू लागले आणि जंगल निर्भय झाले.

**संपर्क : ९९२१६६२८५५**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक सचिन मेहता यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नं. १ ते १०, ई-१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Sachin Mehta, Printed at M/s. Printplus Private Limited, G1 to G10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka-Bhiwandi, Dist-Thane 421311 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004.**
*** Editor - Krishnakumar Patil.**

## * चला चित्र रंगवूया...!!!

सुट्टीत मुलांनी जशी मजा केली तशीच आंब्यांनी आणि कैऱ्यांनी पण खूप धमाल केली. चित्र पूर्ण करा आणि छानसे रंगवा.

रेश्मा बर्वे



# आरोग्यसेवा आणि AI

भाग ५

अच्युत गोडबोले

एखादं नवीन औषध तयार करून ते बाजारात आणणं ही एक प्रचंड वेळखाऊ प्रक्रिया असते. नवीन औषधाची चाचणी (ट्रायल) घ्यायलाच बऱ्याचदा तीन ते सहा वर्षं लागतात! या प्रक्रियेत अक्षरश: कोट्यवधी रुपये खर्च होतात. महत्त्वाचं म्हणजे खूप कमी औषधं या प्रक्रियेच्या वेगवेगळ्या टप्प्यांमधून शेवटपर्यंत पोहोचतात.

'टार्गेट' रेणू शोधण्यापासून औषधनिर्मितीची प्रक्रिया सुरू होते. 'टार्गेट' रेणू म्हणजे नेमकं काय? 'टार्गेट' रेणू हा आपल्या शरीरातला असा रेणू असतो की ज्याला औषधाचा रेणू चिकटतो आणि आपलं काम सुरू करतो. बहुतेक वेळा हा 'टार्गेट' रेणू आपल्या शरीरातला प्रोटीनचा रेणू असतो.

नवीन औषध बनवताना सुरुवातीच्या टप्प्यात टार्गेट प्रोटीनचे रेणू निश्चित करणं गरजेचं असतं. अशा रेणूंची माहिती, त्यांची रचना कॉम्प्युटरमध्ये भरावी लागते. मग कॉम्प्युटर लक्षावधी रेणूंची माहिती असणाऱ्या लायब्ररीमधून टार्गेट प्रोटीनवर फिट होऊ शकेल अशा रेणूंचा शोध घ्यायला सुरुवात करतो. याच कामात AI तंत्रज्ञानामुळे क्रांती घडत आहे. कॉम्प्युटरवर चालणाऱ्या या प्रक्रियेमुळे प्रत्यक्षातल्या प्रयोगशाळेतल्या वेळखाऊ कामाची गरज उरत नाही. गूगलच्या 'डीपमाईंड' या



(फोटो सौजन्य - https://commons.wikimedia.org/wiki)

कंपनीनं बनवलेलं ‘अल्फाफोल्ड’ नावाचं सॉफ्टवेअर यासाठी वापरलं जात आहे. AI तंत्रज्ञानामुळे नवीन औषधाचा नेमका कसा परिणाम होईल हेही अधिकाधिक अचूकपणे सांगणं शक्य होतंय.

रुग्णाला आजारातून बरं करण्यासाठी त्याच्या आजाराचं अचूक निदान होणं आवश्यक असतं. निदान करण्यासाठी डॉक्टर मंडळी रुग्णामध्ये दिसणारी लक्षणं, त्याची मेडिकल हिस्टरी आणि वेगवेगळ्या चाचण्यांचे रिपोर्ट्स पाहतात. आजाराचं निदान झालं की डॉक्टर रुग्णावर करायच्या उपचारांविषयी निर्णय घेतात. AI मुळे या निदानप्रक्रियेतही सुधारणा होत आहेत. AI मुळे कमी वेळेत अधिकाधिक अचूक निदान करणं शक्य होत आहे. एक्स-रेज, एमआरआय, सीटीस्कॅन, अल्ट्रासाऊंड यांच्या इमेजेस AI सॉफ्टवेअर्स बारकाईनं तपासू शकतात. याशिवाय ईसीजी, ईईजी यांच्या आलेखांचं निरीक्षणही AI करू शकतं. शरीराचं तापमान, हृदय धडधडण्याचा वेग, रक्तदाब, श्वसनाचा वेग, रुग्णाच्या आजाराचा इतिहास, वेगवेगळ्या वैद्यकीय चाचण्यांचे अहवाल, स्थानिक लोकांची वैद्यकीय माहिती हे डिजिटल स्वरूपातले माहितीस्रोत लक्षात घेत AI सॉफ्टवेअर डीप लर्निंगसारख्या तंत्रांचा वापर करून रोगाचं निदान करू शकतं. डॉक्टर लोकांना AI तंत्रज्ञानानं केलेलं निदान आणि त्या निदानामागची कारणमीमांसा लगेचच सादर होते. बरेच माहितीस्रोत लक्षात घेतल्यामुळे चुकीचं निदान होण्याची शक्यता कमी होते.

वैद्यकीय क्षेत्रात शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांनाही AI साथ देताना दिसत आहे. शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना आपल्या कामात अतिशय अचूकता लागते. AI तंत्रज्ञानावर आधारित कोबॉट्स शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टरांना मदत करताना दिसतात. या कोबॉट्समध्ये कमालीची अचूकता असते. आपल्या हालचालींवर त्यांचं प्रचंड नियंत्रण असतं. शिवाय त्यांचा हालचालींचा वेगही जास्त असतो. त्याच त्याच हालचाली करायला लागणारी कामं ते न थकता करू शकतात. काही वेळेला कसलीही हालचाल न करता बराच वेळ स्थिर उभं राहण्याची गरज असते, कोबॉट्सना तेही जमतं. शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांची पारंपरिक हत्यारं रुग्णाच्या शरीरात सहजासहजी जिथपर्यंत पोहोचू शकत




नाहीत तिथंपर्यंत कोबॉट्स पोहोचू शकतात. शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांचा अनुभव वाढत जाईल तसं ते शस्त्रक्रियेत तरबेज होत जातात. पण, वयस्कर झाल्यानंतर त्यांचं हालचालींवर पूर्वीसारखं नियंत्रण राहत नाही, त्यांचे हात काही प्रमाणात कंप पावायला लागतात (तसंच त्यांच्या हाताच्या हालचाली थोड्याफार अनियंत्रित होतात). कोबॉट्समध्ये हा प्रश्न येत नाही. या सर्व कारणांमुळे भविष्यात शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात कोबॉट्सचा सहभाग वाढण्याची दाट शक्यता आहे.

IoT (इंटरनेट ऑफ थिंग्ज) सारखाच IoMT (इंटरनेट ऑफ मेडिकल थिंग्ज) हा शब्द आजकाल प्रचलित व्हायला लागलाय. IoMT उपकरणं एकाच वेळी आपल्या शरीराला आणि इंटरनेटला जोडलेली असतात. ही उपकरणं आपल्या आरोग्याशी संबंधित गोष्टींवर (उदा. हृदयाची गती, रक्तदाब वगैरे) सतत लक्ष ठेवतात. आपल्या आरोग्यात काही गंभीर बिघाड झाल्यास ही उपकरणं थेट डॉक्टरांना कॉल लावू शकतात! स्मार्ट वॉच, स्मार्ट रिंग यासारखी उपकरणं याच प्रकारात येतात. उद्याच्या जगात AI मुळे माणसाचं आयुष्यमान नक्कीच वाढणार याविषयी तज्ज्ञांना विश्वास वाटतो!

(क्रमशः)

**संपर्क : achyut.godbole@gmail.com**

**नुकताच मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा प्राप्त झाला आणि सगळ्या मराठी भाषिकांची मान अभिमानाने उंचावली. हजारो वर्षांची परंपरा लाभलेली आपली मराठी ही जगातील एक महत्त्वाची भाषा आहे. मराठी भाषेच्या या वारशांचा सन्मान करणे आणि पुढील पिढ्यांकडे तो अधिक समृद्ध रूपात सुपूर्द करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठी अभिजात भाषा झाली आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी 'बालभारती' आणि महाराष्ट्र शासनाचा 'मराठी भाषा विभाग' मिळून 'अभिजात मराठी' हा उपक्रम राबवत आहोत. या विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.**

# वेचू आनंदे

प्रवीण दवणे

बालमित्र-मैत्रिणींनो!

आपल्या अभिजात मराठी भाषेचा समृद्ध खजिना जाणून घेणे हा एक आगळावेगळा आनंद आहे आणि तोच आनंद आपण सारे घेणार आहोत. ज्याप्रमाणे रत्न पाचू, माणिक यांच्यातील श्रीमंती आपल्याला जाणवते, त्याहूनही अधिक अनमोल श्रीमंती आहे ती आपल्या मराठी भाषेतील शब्दांची! हे शब्द, म्हणी, वाक्प्रचार आपले आयुष्य समृद्ध करत असतात, आनंद देत असतात, परंतु शब्दसुद्धा कुतूहलाने वेचावे लागतात, जपावे लागतात.

भाषेशी सुद्धा मैत्री करावी लागते. ज्याप्रमाणे व्यक्तीला एक व्यक्तिमत्त्व असते त्याप्रमाणे प्रत्येक शब्दालाही त्याचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते; ज्याप्रमाणे रंगांच्या छटा असतात त्याप्रमाणे शब्दांच्याही विविध छटा असतात, त्याच जाणून घेण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत, त्यामुळे भाषेकडे बघण्याचा, शब्दांशी मैत्री करण्याचा तुमचा दृष्टिकोन अधिक जागरूक होईल. या शब्दांमध्ये मनातले कोणकोणते भाव असतात, हे जेव्हा तुम्हांला समजेल, तेव्हा तुम्ही थक्क व्हाल म्हणूनच चला वेचू आनंदे, साहित्य सोन्याची खाण असलेल्या या आपल्या अभिजात मराठीच्या वैभवातील काही हिरे, मोती!

'आरंभ कुठून करावा हीसुद्धा एक कसरत आहे. परंतु आरंभ आरंभापासूनच केला पाहिजे.

एक असते सुरुवात; एक असतो आरंभ, एक असतो प्रारंभ, आणि एक असतो शुभारंभ !

वरवर हे शब्द अगदी समानार्थी वाटतात, परंतु निमित्त बदलले की शब्द कुठे, कसा वापरायचा हे ठरवावे लागते. त्यासाठीच वाचनात सातत्य हवे, आणि श्रवणात एकाग्रता !

ऐकणे आणि श्रवण एकच क्रिया, परंतु कुठलाही आवाज आपण सहज ऐकतो, परंतु काळजीपूर्वक एकाग्र होऊन आपण जे ऐकतो ते 'श्रवण' त्याचप्रमाणे, आरंभ एखाद्या गोष्टीचा, प्रारंभ व्रताचा, शुभारंभ कार्यक्रमाचा!

आरंभाप्रमाणे 'अखेर' या शब्दाची गंमत आहे. 'अखेर' आणि 'सांगता' एकाच अर्थाचे वाटणारे शब्द.

परंतु त्यात वेगवेगळ्या छटा आहेत.

'अखेर'मध्ये एक प्रकारची उदासीनता आहे, 'शेवट' अनेकदा 'अंतिम' या अर्थाने येतो; आणि 'सांगता' ही एखाद्या उत्सवाची होते. तीच गंमत अगदी सतत वापरल्या जाणाऱ्या एका शब्दाची. वृक्ष, झाड आणि तरू एकच. परंतु ज्याला शब्दांची साधना करायची असेल, त्यांनी आपल्याला कोणत्या प्रकारचे 'झाड' अपेक्षित आहे, त्याचाही विचार करायला हवा, वृक्ष म्हटले की महावृक्ष डोळ्यांपुढे येतो. तेही झाडच पण त्याचे विशाल असे रूप व्यक्त करायचे असेल, तर वृक्ष- महावृक्ष असे आपण म्हणतो. 'तरू' हा तुलनेने नाजूक आहे. बाल तरू, असे म्हटले जाते. वृक्षाप्रमाणे वेलही शब्दांतून वेगवेगळे रूप घेऊन येते. मांडवावर चढते ती वेल, आणि वेलाची जेव्हा 'वल्लरी' होते तेव्हा ती अधिक शोभिवंत होते, नक्षीदार होऊन फुलांच्या बहराने नटलेली जाणवते. आणि हीच वेल 'लता' होऊन आली, की त्यात एक वेगळा जिव्हाळा येतो, कल्पलतेचा स्वर्गीय सुंदरतेचा साज येतो. ज्याला वाचनाचा आणि नंतर लेखनाचा सराव करायचा असेल, त्यांनी सरधोपटपणे कुठलाही शब्द कुठेही वापरू नये. ज्याप्रमाणे एखादा दागिना आपण जपून वापरतो आणि तोही समारंभाच्या औचित्याप्रमाणे निवडतो, शब्दांचेही तसेच आहे. भाषा ही एक जिवंत नि प्रवाही, सुखदुःख असलेली घटना आहे. म्हणून तिला दुखावले जाईल असे आपले वागणे, बोलणे नसावे. ज्याप्रमाणे समानार्थी शब्द म्हणताना ते खरे तर अगदी समान नसतात, त्यांचे वेगवेगळे रूप-रंग असतात. त्याचप्रमाणे वस्तू एकच, परंतु त्याची जागा बदलली की अर्थ बदलतो. जसे की, 'नारळ' आणि 'श्रीफळ' वस्तू एकच परंतु 'नारळ' जेव्हा 'श्रीफळ' होतो तेव्हा तो



व्यासपीठावर पाहुण्यांना सत्कार म्हणून दिला जातो. त्याचप्रमाणे पाण्याचे जेव्हा 'तीर्थ' होते तेव्हा पूजेचे मांगल्य त्यात मिसळते. गंमत पहा, तहान लागल्यावर पाणी पितो, आणि 'तीर्थ' प्राशन करतो; म्हणजेच पिणे आणि प्राशन करणे, क्रिया एकच परंतु त्यातील भावभावना वेगळ्या, तसेच प्रमुख पाहुण्यांचे होते ते 'आगमन' आणि इतरांचे असते ते 'येणे'. हा शब्दसुद्धा संदर्भ बदलला की निराळे रूप घेतो.

आता ही केवळ उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे एकाच अर्थाचे वाटणारे परंतु वेगवेगळ्या 'रूप-रंगांचे' अनेक शब्द आपल्याला बघायचे आहेत. एकमेकांत कधी वर्गात असा शब्दांचा खेळ खेळून पहा, खूप मजा येईल. पुढच्या भेटीत आपण शब्दांचे व्यक्तिमत्त्व समजून घेणार आहोत, एखाद्या अक्षराचा किंवा काना, मात्रा, उकाराचा जरा बदल केला की, अनेकदा अर्थ आणि नात्यांचे रूप कसे बदलते हे पाहणार आहोत. एकच लक्षात ठेवा, आपल्या जन्म देणाऱ्या आईप्रमाणे आपल्या सुखदुःखांना व्यक्त करणारी भाषा हीसुद्धा आपली आईच आहे, **भाषाई!**

**संपर्क** : ९८२०३८९४१४

# ओळखा पाहू मी कोठे?

डॉ. नीलिमा गुंडी

केदार शाळेतून घरी आला होता, तो हातपाय आपटतच! तो का बरं इतका चिडला होता? झालं होतं काय, त्याच्या मराठीच्या उत्तरपत्रिकेत खूप लाल खुणा आल्या होत्या. खरं तर, तो चुरुचुरु बोलायचा! त्याचे पाठांतरही छान होते! त्यामुळे आपल्याला इतके कमी मार्क्स मिळाले, हे त्याला स्वतःला मान्यच होत नव्हते!

आईने त्याला आधी थोडे प्रेमाने थोपटले. त्याला शांत केले. त्याच्यासाठी केलेली सोलकढी त्याला प्यायला दिली नि मग त्याचा पेपर पाहायला मागितला. बोलणे आणि लिहिणे यात अंतर असतं, हे केदारला पुरेसे कळले नव्हते! बोलता येते म्हणजे अचूक लिहिताही येते, ही त्याची समजूत झाली होती. त्याच्या आईने त्याला हळूहळू कसे समजावले, ते पाहू या!

''अरे केदार, तू 'सुखदुख' असं लिहिलं आहेस, 'दुःख' शब्दात दोन अक्षरांमध्ये विसर्ग असतो, हे विसरलास वाटतं?'' आईच्या या प्रश्नावर केदारची उत्तरे तयार होती. ''अगं आई, सुखदुखच हवं! ते शब्द जोडीने येतात, म्हणजे एकसारखेच असणार! आणि आपण 'डोकं दुखतंय' असं म्हणतो! दुःखतंय असं म्हणतो का? माझंच बरोबर आहे!''



''अरे केदार, दुःख हे नाम आहे. तो स्वतंत्र शब्द आहे; आणि दुखणे हे क्रियापद आहे. तेही स्वतंत्र आहे. सुखदुःख हे शब्द जोडीने येत असले, तरी तेही स्वतंत्र आहेत. त्यांचे अर्थही वेगळे आहेत. दोन जुळे भाऊ स्वभावाने वेगळे असू शकतात! तू आता असं लक्षात ठेव की दुःख झालं की, डोळ्यांतून अश्रू येतात. म्हणून दुःख शब्दात दोन अक्षरांमध्ये विसर्गाचे चिन्ह असलेली दोन टिंब म्हणजे दोन अश्रू बिंदू आहेत जणू! म्हणजे तू विसर्ग चिन्ह काढायला विसरणार नाहीस!'' आईने त्याला छान पटवून दिले. मग ती त्याला आणखी माहिती देत म्हणाली, ''अरे, तुझ्या एका मित्राचं नाव 'सोहं' आहे ना? गंमत म्हणजे ते नाव म्हणजे संस्कृतमधला एक शब्द आहे. आणि त्या मूळ शब्दात विसर्ग आहे, बरं का! सः+अहम् असा संधी होऊन तो शब्द तयार होतो. त्याला एकदा विचार तुझ्या नावाचे मूळ काय ते? कोडेच घाल त्याला!'' केदारला आईची ही कल्पना आवडली. मग तोही खुलून बोलू लागला.

केदार म्हणाला, ''आई, आमच्या ताई म्हणतात की काही मुलं 'अहा' असं लिहिण्याऐवजी चुकून 'अः' असं लिहितात!''

''अरे, विसर्गाचा उच्चार 'हा' असा नाही. तो थोडा वेगळा आहे. तो फरक लक्षात नाही आला की अशा गमती होतात. मग 'शब्दशः' लिहिताना 'शब्द शहा' असं चुकीचं लिहिलं जातं!'' आईचे हे शब्द ऐकून केदार हसू लागला. तेवढ्यात आई त्याला म्हणाली, ''मी सांगते ते शब्द लिही पाहू–१) दुःशला २) कःपदार्थ ३)अंतःकरण ४) विशेषतः ५) स्वतः ६) प्रातःकाल

गंमत म्हणजे केदारने सर्व शब्द बरोबर लिहिले. मग आई त्याला शब्दांमध्ये लपलेला विसर्ग कसा ओळखायचा, ते समजावून सांगू लागली. ती म्हणाली, ''केदार, मी तुला काही शब्द लिहायला सांगते. ते नीट लिही पाहू. मग त्या शब्दांमधले दोन घटक वेगळेही करून दाखव. बघू या तुला जमतंय का? त्याला संधी सोडवणं असं म्हणतात बरं का!''

केदार आता सरसावून बसला. आईने सांगितलेले व तपासलेले शब्द होते :




✓१) निराशा – निः + आशा
✓२) निर्जीव – निः + जीव
× ३) नीरस – नीः + रस
× ४) नीरव – नीः + रव
✓५) निष्काम – निः काम
✓६) चतुरंग – चतुः + अंग

आईने वही तपासली आणि चुकीचे शब्द दुरुस्त करून दिले. ते असे होते – नीरस – निः+रस, नीरव – निः+रव आई म्हणाली, ''अरे, निः हा 'उपसर्ग' संस्कृतमधून आला आहे. उपसर्ग हा शब्दाआधी लागतो. निः हा उपसर्ग नकारार्थी आहे. तो शब्दाच्या आधी लागला की शब्दाचा अर्थ बदलतो, नकारार्थी शब्द तयार होतो. त्या उपसर्गामुळे शब्दाचे रूपही किती प्रकारे बदलते, ते पाहा. कधी त्या 'निः' चे रफारात रूपांतर होते. कधी त्याचा 'ष्' होतो. कधी त्याच्यामुळे पुढचे अक्षर दीर्घ होते– जसे नीरस, नीरव या शब्दांमध्ये घडले आहे. तो 'विसर्ग' जणू तुम्हांला विचारतो की ओळखा पाहू मी कोठे? तुम्हां मुलांशी तो जणू लपाछपीचा खेळ खेळतो. तुम्ही त्याची जागा अचूक शोधली पाहिजे. काय?''

''हे छान आहे! आई, 'निः' हा उपसर्ग म्हणजे मला आगगाडीचं इंजिन वाटतंच! इंजिन ज्या दिशेला असतं, त्या दिशेनं गाडी जाते– 'नि'ः हे इंजिन लागलं की गाडी नकाराच्या अर्थाकडे वळते. गंमतच आहे गं!'' केदार म्हणाला.

तेवढ्यात शेजारचा छोटा निरंजन 'झुक झुक' करत गाडीगाडी खेळत आला नि दारामागे लपून म्हणाला, ''ओळखा पाहू मी कोठे?'' यावर सगळे हसू लागले.

(क्रमशः)

**संपर्क : ९८८१०९१९३५**

# माय मराठी

नीलिमा फाटक

प्राचीन देही
अनमोलसा
रत्नभांडार ती
निसर्गकुशीतले
सुंदर वरदान ती
नाव काय तिचे ?
कोणते आहे गाव
अलौकिक तिचे घर
जिथे प्रेमप्रचिती
अन् अद्‌वितीय महती
कोण आहे ती ?
खरंच कोण बरे ती....

प्राकृताच्या मायेतून
पवित्र श्वेतवनात
खळखळती गंगा
झुळझुळली
आद्यकवी
मुकुंदराजांच्या
विवेकसिंधूस
कशी अलगद
येऊन मिळाली
ती मी होय....



श्रीसरस्वतीच्या
स्वरूपिणी वेषात
जगन्माऊली
श्रीज्ञानदेवांच्या
मागे मागे चालू लागली
मनमुक्तपणे
अंगाखांद्यावर खेळत
शांत मितीचा
चांदवा लेवून
भावार्थदीपिकेत
गोड निर्झराप्रमाणे
विराजमान झाली
ती मी होय...




श्रीनामदेवांच्या
विलक्षण परिवारात
सत्यसगुण निनादात
कोटी कोटींच्या
पावनशा तीर्थात
पंढरीच्या भीमातीरी
संतांच्या मेळ्यात
आनंदवन भुवनात
स्वयंभू जगदंबा
प्रकटली
ती मी होय...

हलके हलके
महानुभावांच्या,
चक्रधर स्वामींच्या
खंबीर आश्रयात
सकळा स्थिरावली

आद्य कवयित्री
महदंबेच्या
ओंजळीतून
मंजुळशा कायेत
पैठणीसह
शालूशेल्यात सजली
धवळ्यात बसली
मुंडावळ्या ल्यायली
ती मी होय...

कधी मुक्ताईच्या
अगम्यशा गुढातून
सहज निघाली
वेदनेच्या काठांतून
निर्वेध वाहिली
भागवतांच्या
अमृतमधुरसृष्टीतून
तिने नव्या डौलदार
विशाल साजातल्या
स्वर्णिम पंखात
गरूडभरारी घेतली
ती मी होय....




जनाबाई
कान्होपात्रेने
नित्य घेतलेल्या
निर्लेप आधाराच्या
आत्मशोधातून
सार्थकता झरली

त्या जीवनाच्या
श्रमसाफल्यात
हळूवारपणे
जी जोजवली
मूर्त देखणी माया
ती मी होय....




अंधारयुग संपले
नि कबीरांच्या ,
रामदासांच्या
रामनामात रंगली
श्रीएकनाथांच्या
श्रेष्ठ सावलीत
विशुद्‌ध लखलखत्या
जरतारी किनारीचे
सौंदर्य झळाळीत
तावूनसुलाखून
मंथनाच्या घटातून
नवनीत झालेली
ती मी होय



स्टीफन्सच्या
ख्रिस्तपुराणात
झळकलेली
शेख महमंदाच्या
योगसंग्रामी
बहरलेली
जैनमुनींच्या
कृष्णगीतांतून
नव आभूषणांत
मुग्ध शृंगारलेली
नवयौवना
ती मी होय...

श्रीतुकारामांच्या
मांडीवर बसून
इंद्रायणीच्या
रम्य तीरावर
निर्गुणात रमली
बहिणाबाईंच्या
आत्मचरित्रात
बंडखोरपणे
स्थापित झाली
ती मी होय...




श्रीशिवरायांच्या
राजदरबारात
त्या वैभवशाली
हिंदवी साम्राज्यात
मोहरली, बहरली,
सहज विस्तारली
अन् स्थिरावलीही
ती मी होय....

पंडिती प्रशंसेत
अनोख्या कलेत
लावणीच्या ठेक्यात
नि शाहिरीच्या डफात
बंदा रुपया
जी खणखणली
कधी नाजूकशा
तर कधी साजूकशा
पावलांतही रुणझुणली
ती मी होय...

लोकमान्यांच्या,
वीर सावरकरांच्या
महात्मा फुले, राजर्षि शाहू,
डॉ.आंबेडकर,
नि आगरकरांच्या
अस्मितेत राहिली
मानबिंदूत झळकली
अन् क्रांतिज्योत पेटली
ती मी होय....

निसर्गाच्या लहरींत
भावनेच्या आकाशात
उजळलेल्या दिशांत
सूर्यचंद्र प्रकाशात
निराळ्याच संवेदनेत
समृद्‌धशा प्रवाहात
वैविध्याच्या तालात
विद्रोहाच्या प्रदेशात

विनोदाच्या मळ्यात
हास्याच्या फुलोऱ्यात
अशा अनेक काठात
सखी म्हणून जगली
अभिमानाने स्मरली
अशी..
अभिजात नक्षत्र
जी गगनी विहरली
ती मीच होय....
होय तीच मी...
तुमची प्रियतमा
मी मराठी भाषा...
मला केवळ तिचीच अभिलाषा....



संपर्क : ९८२३०१३६९२

# गंमत शब्दांची

प्रा. विश्वास वसेकर
संपर्क : ९९२२५२२६६८



## तारांबळ

आपल्याकडे लग्न वगैरे विधींमध्ये शुभमुहूर्त चुकू नये म्हणून उपाध्ये फार जपत असतात. त्यासाठी मंत्री-तंत्र वेळच्या वेळी आटोपण्यासाठी घाई करत असतात. या घाईचा अतिरेक ''ताराबलं चंद्रबलं तदेव'' या शब्दाच्या उच्चाराच्या वेळी होतो. यावरून वाक्प्रचार तयार झाला. तारांबळ होणे किंवा उडणे. एखाद्याची तारांबळ उडणे याचा अर्थ त्याची धांदल होणे.

## पंगत



अनेक लोक एकाच रांगेत जेवायला बसलेले दिसतात, तेव्हा त्यांच्या त्या रांगेला पंगत म्हटले जाते. पंगत शब्दाचे मूळ 'पंक्ति' या संस्कृत शब्दात आहे आणि 'पंक्ति' या शब्दाचेही एक विशेष स्पष्टीकरण आहे. वसंततिलका, शार्दूलविक्रीडित इत्यादी अक्षरगणवृत्तांपैकी पंक्ति हे एक अक्षरगणवृत्त असून 'पंक्ति' शब्द पाच या शब्दातून निर्माण होतो. या रचनेमध्ये प्रत्येक ओळीत पाच अक्षरे असतात. जेव्हा जेवणाची पंगत बसते तेव्हा ती एक-दोघांची असू नये, किमान पाच जणांची असावी हे पंगत या (पंक्ति) शब्दातून सुचवले जात आहे.




## विदुषी

'या ठिकाणी जमलेल्या अनेक विदुषींचेही मी मनःपूर्वक स्वागत करतो' असे स्वागतपर उद्‌गार एखाद्या सभेत प्रास्ताविक करणाऱ्या वक्त्याने काढले, तर अनेकांच्या किंवा अनेकींच्या मनात 'विदुषी' या शब्दाच्या अर्थाबद्दल संशय आणि कुतूहल उत्पन्न होते. विदुषी या शब्दाचा उच्चार विदूषक या शब्दाच्या जवळ जाणारा आहे, हे या संशयाचे कारण असते. पण 'विदुषी' या शब्दाचा विदूषक या शब्दाशी काहीही संबंध नाही. संस्कृतमध्ये विद् (वेत्ति) असा एक धातू आहे. विद्या हे नामही या 'विद्' पासूनच मिळते. विद् म्हणजे जाणणे. या 'विद्' धातूपासून विद्वस् (विद्वान) हा शब्द तयार होतो. विद्वान म्हणजे जाणकार. त्यातला मूळ शब्द 'विद्वस्' आणि त्याचेच स्त्रीलिंगी रूप आहे विदुषी. पुरुषासाठी विद्वान हे पुल्लिंगी विशेषण तर स्त्रीसाठी विदुषी हे स्त्रीलिंगी विशेषण! संस्कृत ही 'भाषा' म्हणून वापरात होती त्या काळातही विद्वान स्त्रिया होत्या म्हणजे स्त्रिया शिक्षणापासून वंचित नव्हत्या, असा याचा अर्थ आहे.

## कोलदांडा



सुमारे चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी शाळेमध्ये आगाऊपणा करणाऱ्या मुलांना किंवा भुरट्या चोऱ्या करणाऱ्या चोरांना पोलीस ठाण्यात शिक्षा म्हणून कोलदांडा देत असत. ज्याला शिक्षा करावयाची आहे त्याला उकिडवे बसवून आणि दोन्ही हातात पाय देऊन त्याचे हात बांधले जात. मग कोपरे आणि गुडघे यांच्यामधून एक मनगटाएवढा लाकडाचा दांडा आडवा घालत. असे करणे याला कोलदांडा घालणे असे म्हणतात. याचा मूळ अर्थ 'नाठाळ जनावरांच्या गळ्यात अथवा पायांत अडकवायचा लाकडी दांडका'. जनावरांच्या गळ्यात बांधलेल्या या दांडक्यामुळे त्याला वेगाने चालता येत नसे म्हणजेच त्याच्या चालण्यामध्ये आडकाठी उत्पन्न व्हायची. कानडी भाषेत 'काठी' या शब्दासाठी 'कोळ' असा शब्द आहे. त्याला जोडून संस्कृतातला 'दंड' या शब्दाचा समास झाला. त्यातून मराठी शब्द तयार झाला 'कोलदांडा'.

# प्रश्नमंजुषा

**उदय कदम**

**१. खालीलपैकी कोणत्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे?**

अ) पाली ब) मराठी

क) आसामी ड) प्राकृत

१. फक्त अ बरोबर २. फक्त ब बरोबर

३. अ ब क बरोबर ४. सर्व पर्याय बरोबर

**२. खालीलपैकी कोणता दिवस 'मराठी भाषा गौरव दिवस' म्हणून साजरा केला जातो?**

१. २७ मार्च २. २७ फेब्रुवारी

३. १ मे ४. २७ सप्टेंबर

**३. मराठी भाषेची खालीलपैकी कोणती लिपी आहे?**

अ) खरोष्टी लिपी ब) देवनागरी लिपी

क) बाळबोध लिपी ड) मोडी लिपी

१. फक्त अ बरोबर २. फक्त अ व ब बरोबर

३. फक्त ब व क बरोबर ४. सर्व पर्याय बरोबर

**४. मराठी भाषेतील पहिला शिलालेख खालीलपैकी कोणत्या ठिकाणी आढळतो ?**

१. पाली २. आक्षी

३. पुणे ४. सिन्नर

**५. मराठी भाषेतील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार कोणत्या साहित्यिकाला मिळाला ?**

१. विष्णू वामन शिरवाडकर

२. विष्णू सखाराम खांडेकर

३. गोविंद विनायक करंदीकर

४. भालचंद्र नेमाडे

**६. मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा!**
**प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा..**
**हे गीत खालीलपैकी कोणी लिहिले आहे?**

१. गोविंदाग्रज २. विंदा करंदीकर

३. बा.भ. बोरकर ४. इंदिरा संत

**७. अहिराणी भाषा खालीलपैकी कोणत्या प्रदेशात बोलली जाते ?**

१.मराठवाडा २. पश्चिम महाराष्ट्र

३. खान्देश ४. माणदेश

**८. खालीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा.**

१. आशीर्वाद २. तज्ज्ञ

३. पारंपरिक ४. अल्पसंख्यांक

**९. 'माझा मराठाची बोलू कौतुके।**
**परी अमृतातेहीं पैजांसी जिंके।'**
**असे मराठीबद्दल कोणी उद्गार काढले आहेत?**

१. संत नामदेव महाराज

२. संत तुकाराम महाराज

३. संत ज्ञानेश्वर महाराज

४. संत एकनाथ महाराज

**१०. कोणता दिवस 'मराठी अभिजात भाषा गौरव दिवस' म्हणून साजरा केला जाणार आहे?**

१. १ ऑक्टोबर २. २ ऑक्टोबर

३. ३ ऑक्टोबर ४. ४ ऑक्टोबर

संपर्क : ९७६७३१३८४३

घनश्याम देशमुख

## खाली दिलेल्या चित्रपट्ट्यांचा योग्य क्रम लावा.



१ 

२ 

३ 

४ 

५ 

६ 

७ 

८ 

# चिंच

देविदास सौदागर

शाळेच्या जेवायच्या मधल्या सुट्टीत,
प्रियाने खाल्ले चिंचेचे इवलेसे बुटूक.
थोडे आंबट अन् थोडे गोड
जरा हिरवे अन् जरा लाल चुटूक.

चिंचेचे बुटूक चोखून–चोखून खाताना,
लय लय भारी मज्जाच–मज्जा आली.
तुरूतुरू पळणारी खारूताई सुद्धा,
इवली–इवलीशी चिंच खाताना दिसली.

चिंचेच्या झाडाखाली दाट सावली,
तिथं झोका घेतला थोडा वेळ
चिंच खाल्ल्यावर उरले चिंचोके,
ते घेऊन खेळला चौकड्याचा खेळ.

चिंचा खाऊन खाऊन शेवटी,
तिचे दात थोडे कळकले.
चिंचा जरा जास्तच खाल्ल्यात,
हे मग बाईंनी ओळखले.

बाईंनी डोळे वटारून विचारलं,
चिंच कशी वाटली सांग तरी.
तेव्हा ती म्हणाली, चिंच खाताना वाटलं,
अरेच्चा हा लॉलीपॉप तर आहे भारी.

संपर्क : ९१७५५४६५९३



# घरच्याघरी रंगीत टी.व्ही.

नरेंद्र दाभाडे

बालमित्रांनो, परीक्षा संपल्या! मे महिन्याच्या सुटट्यापण सुरू झाल्या. दोस्त कंपनी सुटीसाठी बाहेर गावी गेल्याने मैदानावर जास्त वेळ खेळताही येत नाही. आई म्हणते, ''पाडव्याच्या पूजेनंतर आपण मामाकडे जाऊ.'' घरात तेच तेच खेळ पुन्हा पुन्हा खेळून कंटाळा आला असेल. टी.व्ही. चालू करावा म्हटले तर

'लांब बस.'

'बटणांना हात लावू नको.'

'टी.व्ही. खराब करशील.'

अशी दमदाटी करून टी.व्ही. पासून लांब अंतरावर, हाताची घडी करून, बसायला लावले जात असेल. अशा वेळेला खूप चरफडायला होते. पण राग वगैरे सर्व गिळून गप्प बसावे लागते. लहान पडलो ना !



तर बालमित्रांनो, ह्या मोठ्यांच्या टी.व्ही.ची मिजास ठेवण्याची काहीच गरज नाही बरं का. मी तुम्हांला एक खेळण्यातला टी.व्ही. आज शिकवणार आहे. ह्याच्या पडद्यावर हालचाल करणारी चित्रे तुम्ही पाहू शकाल. प्राणी, पक्षी पाहता येतील. अगदी तुम्हांला सुद्धा पडद्यावरच्या कार्यक्रमांत भाग घेता येईल. फक्त ही चित्रे उलटी दिसतील, एवढेच.

**सर्वात अगोदर आपल्या ह्या टी.व्ही.ला काय साहित्य लागते, ते पाहू**

* एक १२ इंच लांब, ९ इंच रुंद व ५ इंच खोली असलेला जाड पुठ्ठ्याचे खोके.
* १० इंच लांब व ८ इंच रुंद असा ट्रेस पेपर.
* ज्याचे नाभीय अंतर ४ इंच आहे असे उत्तम बहिर्गोल भिंग.
* डिंक, पेन्सिल, पट्टी, ब्लेड, एका छोट्या वाटीत थोडं रॉकेल व कापसाचा बोळा.

■ सर्व प्रथम खोक्याच्या १२ इंच × ९ इंच दर्शनी भागावर खाली, वर आणि डावीकडे एक इंच जागा राहील असा ९ इंच × ७ इंच आकाराचा आयत पेन्सिलने आखून घ्या. नंतर त्याला ब्लेडने व्यवस्थित कापा. ह्या कापलेल्या भागाच्या बरोबर केंद्र स्थानी येईल असा भिंगापेक्षा किंचित कमी आकाराचा गोल खोक्याच्या मागील बाजूवर कापा व त्यावर भिंग दोरा अथवा चिकटपट्टीच्या सहाय्याने बसवा.

■ आता वर सांगितलेल्या आकाराचा ट्रेस पेपर घेऊन त्यावर रॉकेलमध्ये बुडवलेला कापसाचा बोळा हलक्या हाताने फिरवा. म्हणजे ट्रेस पेपर चांगला पारदर्शक होईल. आता हा ट्रेस पेपर खोक्याच्या कापलेल्या आयताकृती भागावर आतल्या बाजूने चिकटवा. हा झाला आपल्या टी.व्ही.चा पडदा.

आता घरातील अशी एखादी जुनी खिडकी अथवा दार निवडा की ज्याला पुरेशा उंचीवर एखादे छोटे छिद्र असेल व बाहेरच्या बाजूला भरपूर सूर्यप्रकाश असेल. आपल्या टी.व्ही.चे भिंग त्या छिद्राला समांतर लावा. खिडकीबाहेरचे दृष्य आपल्या पडद्यावर उमटेल. खोका पुढे मागे सरकवून पडद्यावरचे चित्र सुस्पष्ट करा. आपला टी.व्ही. असलेल्या खोलीत काळोख असल्यास पडद्यावरचे चित्र आणखी छान दिसेल.

■ खिडकीबाहेरील हालचाली तुम्हांला आत बसून पडद्यावर पाहता येतील. आणि बालमित्रांनो, हा तुमचा रंगीत टी.व्ही. आहे बरं का. साधासुधा ब्लॅक अँड व्हाईट नाही.

■ एखाद्या बंद खोलीत विजेचा उजेड करून आपल्याला स्टुडिओसारखा उपयोग करता येईल. त्या खोलीत जे करमणुकीचे कार्यक्रम तुम्ही कराल ते बाहेरच्या मंडळींना आपल्या टी.व्ही. वर पाहता येतील. फक्त भिंगावर सरळ प्रकाश पडणार नाही ह्याची काळजी घ्या.

■ वर दिलेली मापे तुम्ही सोयीनुसार बदलू शकता. फक्त टी.व्ही.चा पडदा भिंगाच्या नाभीय अंतरापेक्षा थोड्या जास्त अंतरावर असला पाहिजे.

(नाभीय अंतर = प्रकाश किरणे भिंगातून गेल्यावर जेथे एकत्र येतात त्या बिंदूपासून भिंगाचे अंतर)

**शास्त्रीय तत्त्व :** बहिर्गोल भिंगाच्या नाभीय अंतराच्या दुपटीपेक्षा जास्त अंतरावरील वस्तूवरून परावर्तित होणारे किरण त्या भिंगातून गेल्यास नाभीय अंतर व त्याच्या दुपटीचे अंतर ह्या दरम्यान त्या वस्तूची उलट प्रतिमा तयार करतात.

**संपर्क** : ९६१९४५५४५४


इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीची'
मराठी व इंग्रजी माध्यमातील
दर्जेदार व गुणवत्तापूर्ण प्रात्यक्षिक कार्य नोंदवही
BIOLOGY
Practical Notebook
Standard XII
PHYSICS
Practical Notebook
Standard XII
CHEMISTRY
Practical Notebook
Standard XII
नोंदणीकृत विक्रेते व
शैक्षणिक संस्थांना
१५% सवलत
अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान
प्रात्यक्षिक पुस्तिका
इयत्ता बारावी
राज्यातील इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी
तज्ज्ञ शिक्षकांच्या सहाय्याने
तयार करण्यात आलेल्या विविध विषयांच्या
उपयुक्त प्रात्यक्षिक नोंदवह्या.
दैनंदिन तसेच स्वयंअभ्यासाकरिता
तसेच उजळणीकरिता उपयुक्त.
भूगोल
GEOGRAPHY
Practical Book
STANDARD XII
Practical Book
Mathematics & Statistics
Arts & Science
STANDARD XII
Practical Book
Mathematics & Statistics
Commerce
वरील प्रात्यक्षिक कार्य नोंदवही खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा
विभागीय भांडारे
पुणे-९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)- ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर- ९४२३००५०७३, नागपूर- ९४२३००५०७२,
नाशिक-९४२३००५०७४, लातूर- ९४२३००५०७५, कोल्हापूर- ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल- ९४२३००५०७८

# पंखा

अद्वैता उमराणीकर

काय रे पंख्या
छतावर कसा?
तीन हातांचा
राक्षस जसा
वारा नुसता
फिरत असतो
पक्ष्यांना उंच
उडवत नेतो
पाण्याची वाफ
ढकलत असतो
पावसाचे थेंब
शिंपडत बसतो
दंगा केला एकदा खूप
छताला बांधून ठेवले हूक
शिक्षा म्हणून दिले घर
खाली डोकं पाय वर

संपर्क : ९९२२०८११७३



# आंब्याच्या वनातील नाचरा मोर

ललिता सबनीस

अथांग समुद्र किनारा, खारट पाण्याच्या दुधाळ लाटा, मुक्त मासोळ्या! एकमेकांवर आदळणाऱ्या लाटांचा होणारा संगीतमय आवाज, पाण्याचं खळखळून हसणं! आनंद व्यक्त करणारा असा सखा साक्षी समुद्र, त्याला लागून कोकणपट्टी, त्यात आमचं गाव. प्रचंड झाडी, कौलारू घरं, घरांच्या मागेपुढे मोठी मोठी अंगणे. अंगणात तुळशी वृंदावन. डोंगराळ भागात वसलेले आमचे छोटे खेडेगाव. चारी बाजूंनी निसर्गाने वनराई अगदी मोकळेपणाने उधळलेली. खेड्यातील आमचं घर साधं दगडामातीचं. खूप मोठं ! त्याला वाडाच म्हणा! मोठे मोठे भक्कम खांब. मोठी ओसरी, बैठक, त्यात आमच्या आजोबांचं वास्तव्य.

वाड्याच्या मागेपुढे मोठी जागा म्हणजेच शेती.



आमराईत भरपूर आंब्याची झाडं. किती प्रकारचे आंबे? हापूस, पायरी, लंगडा, केशरी, बदाम अशी अनेक झाडे होती. झाडे इतकी जवळजवळ की ते एकमेकांशी गप्पा मारत आहे असे वाटावे! आमराईच्या पुढे गेल्यावर फणस, जांभूळ, काजू, सुपारी !

मला तर माझं फुलाफळांचे कोकण आवडतं. मखमली फुलांच्या चांदण्यात बहरलेले ते नंदनवन आहे. ताडामाडाची झाडे उंच उंच वाऱ्याबरोबर वेगाने डोलताना दिसतात. सूर्याच्या लाल रंगाने केलेली उधळण, अनेक पक्ष्यांचा किलबिलाट, सकाळी उमलणारी फुले! मधमाशी आणि भुंग्याने त्यावर केलेले गुंजन. अधूनमधून कोकिळेचा स्वर कानी यावा आणि मन प्रसन्न व्हावे. कावळा, चिमणी, पोपट, सुतार पक्षी आपल्याच नादात अगदी मुक्तपणे आकाशात घिरट्या घालतात. बगळे तर एका रांगेत विहार करताना दिसतात. असे वाटते मोत्यांची सुंदर माळ गुंफली आहे.

वाड्याच्या मागच्या आमराईत पिसारा फुलवून आपल्याच नादात नाचणारा मोर आणि लांडोर हजेरी लावायची. परंतु मोर खूप सुंदर! त्याला निसर्गाने इतकं सौंदर्य दिले की त्याचे रूप डोळ्यांत साठवताना धन्यता वाटते. डोळ्यांचे पारणे फिटते. वाटलं आपण या प्राणीमात्रांना आपुलकीने, प्रेम भावनेने वागवले पाहिजे. करुणेने पाहिले पाहिजे. आम्ही साधारण उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये मामांची आणि मावश्यांची मुलं आजी-आजोबांकडे जमत असू! आम्ही एक दोन असे नव्हतोच' आमचा आकडा दहा बाराच्या वर जायचा. सर्व जमलो की खोड्या, रुसवे, फुगवे, भांडणे ही होणार! आम्ही वर्षातून एकदा तरी कोकणात जातो! आजीआजोबा तर निसर्गातच जन्मले होते. आमचे आईबाबा त्यांना नेहमी शहरात बोलावत. पण ते म्हणायचे त्या सिमेंटच्या उंच इमारतींमध्ये आमचा जीव गुदमरतो. आम्ही आपले वनराईच्या छायेत खूप सुखी आहोत. आंब्याचे दिवस होते. घरात सर्व छोटे-मोठे मिळून वीस-पंचवीस माणसे होती. आमची मामी गृहलक्ष्मी होती. तिच्या हाताला खूप चव होती. इतक्या माणसांचा स्वयंपाक ती आनंदाने करायची. सर्व चारीठाव पदार्थ आणि आंब्याचा रस मात्र रोजच! तिला कधी कंटाळा नसायचा. आजोबा तर दर दोन-चार दिवसांनी एक आंब्याचे झाड उतरवत. आंब्यांनी खोल्या भरलेल्या असायच्या.

रोज खेळणे, कधी लगोरी, कधी पत्ते, कथ, विटीदांडू... वेळ कसा जायचा ते कळायचेच नाही. सर्व भावाबहिणींच्या, मित्रमैत्रिणींच्या गप्पा रंगत असत. आजीचा मात्र एक नियम होता. सर्वांनी दिवसभर कितीही मस्ती केली तरी सायंकाळी देवाजवळ दिवा लावून सर्वांना नमस्कार करायचा, पाढे म्हणणे अगदी आवश्यकच होते. रोज सायंकाळी हे दोन तास आजीचे असायचे. तिने आम्हांला खूप चांगले संस्कार दिले.

कोकणात दीड-दोन महिने जायचे हे कळायचे नाही. आई-बाबांकडे परत जायला चार-आठ दिवस बाकी राहिले की रुखरुख वाटे !

मे महिना संपत आला. मध्येच खूप ऊन पडायचे. सावली यायची. आंबेही थोडे कमी व्हायचे. दीड-दोन महिने भरपूर आंब्याची चव चाखायला मिळायची.

मी आमराईत फिरत असताना मला मोर दिसला. आपल्याच नादात तो थुई थुई नाच करत होता. सुंदर मनमोहक पिसारा फुलवत होता. ढग थोडे भरून आल्यासारखे वाटत होते. पिसारा फुलवून नाचणारा मोर पाहताना वाटे जसे त्याच्या पायात कुणी घुंगरू बांधले होते. राजाच तो! डोक्यावरचा सुंदर पिसारा जसा सुवर्णनक्षीचा राजाचा मुकुट! मोर मोरपंखी पिसारा फुलवून नाचत असताना डोळे आणि मन तृप्तीचा आनंद घेत होते. नकळत माझ्या मनात कोकणचा आंबा आणि झिम्मा खेळणारा राजा यांच्या गाण्यातील संदर्भ जागे झाले.

**आंबा पिकतो, रस गळतो,**
**कोकणचा राजा बाई झिम्मा खेळतो..**

त्याला जोडूनच मोराच्या नृत्याचे गाणेही आठवले.

**नाच रे मोरा आंब्याच्या वनात, नाच रे मोरा नाच..**

आमराईत आंब्याचा गळणारा रस आणि झिम्मा खेळणारा कोकणचा राजा यांचे मनोहरी चित्र मनात प्रतिबिंबित झाले. याच आमराईतील मोराचा पिसारा ही माझ्या मनाने घट्ट बिलगून धरून ठेवला.

**संपर्क** : ८२०८५४६३९५

**वसुंधरा भोपळे**

# कुतूहल

‘किशोर’ मित्रांनो,
‘किशोर’ एप्रिल २०२५ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे ‘किशोर’कडे २५ मे २०२५ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

संपर्क : ७३८७४३२९४१

**१. ‘जागतिक तंबाखू विरोधी दिन’ कोणत्या दिवशी साजरा केला जातो?**
१) ३० एप्रिल २) ३१ मे
३) २१ मे ४) १३ मे

**२. भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशांच्या राष्ट्रगीताचे कवी रवीन्द्रनाथ टागोर यांना, कोणत्या रचनेसाठी १९१३ साली साहित्यातील नोबेल पुरस्कार मिळाला?**
१) काव्यांजली २) गीतांजली
३) पुष्पांजली ४) चतुरंग

**३. १ मे हा दिवस दरवर्षी कामगार दिन तसेच महाराष्ट्र दिन म्हणूनही साजरा केला जातो. १९६० साली या दिवशी खालीलपैकी कोणत्या प्रांताचे विभाजन होऊन महाराष्ट्राची निर्मिती झाली?**
१) गोवा २) मुंबई
३) म्हैसूर ४) नागपूर

**४. १७ जानेवारी २०२५ रोजी ‘तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहस जीवनगौरव पुरस्कार – २०२३’ खालीलपैकी कोणाला प्रदान करण्यात आला ?**
१) उदय कुमार २) जितिन विजयन
३) सयानी दास ४) उमेश झिरपे

**५) बिहू आणि झुमर हे कोणत्या राज्याचे पारंपरिक नृत्यप्रकार आहेत?**
१) आसाम २) अरुणाचल प्रदेश
३) तामिळनाडू ४) पंजाब

**६) दिल्लीमध्ये पार पडलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद कोणी भूषवले?**
१. डॉ.तारा भवाळकर २) डॉ. अरुणा ढेरे
३. डॉ. रवींद्र शोभणे ४) डॉ. नरेंद्र जाधव

**७) मराठीतील कथाकार आणि ज्येष्ठ कादंबरीकार रा. रं. बोराडे यांची खालीलपैकी कोणती बालकादंबरी प्रसिद्ध आहे?**
१) झोंबी २) शिका, तुम्ही हो शिका
३) नांगरणी ४) घरभिंती

**८) राज्य मराठी विकास संस्थेमार्फत नुकतेच कवितेचे गाव साकारण्यात आले आहे त्यासंदर्भात खालील प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.**
**मंगेश पाडगावकर : उभादांडा (वेंगुर्ले): कुसुमाग्रज : ?**
१) ऐतवडे २) शिरवाडे
३) वसगडे ४) राशिवडे

**९) खालीलपैकी कोणती नदी समुद्राला मिळण्यापूर्वीच जमिनीत लुप्त होते?**
१) यमुना २) लुनी
३) तापी ४) कावेरी

**१०) खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यांच्या गटात हापूस आंब्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते ?**
१. रत्नागिरी, देवगड, सिंधुदुर्ग आणि रायगड
२. कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर
३. नागपूर, चंद्रपूर, भंडारा आणि गडचिरोली
४. धुळे, नंदुरबार, नाशिक आणि अमरावती

**११) राष्ट्रकुल तसेच आशियाई स्पर्धांत भारताला पदके मिळवून देणारा खेळाडू अचंत शरथ कमल याने २०२५ साली आपल्या खेळातून निवृत्तीची घोषणा केली आहे. तो -------- या खेळाशी संबंधित आहे.**
१) बॅडमिंटन २) टेबल टेनिस
३) कुस्ती ४) मल्लखांब

**१२) 'जंगल अम्मा' म्हणून परिचित असणाऱ्या तुलसी गौडा यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना भारत सरकारतर्फे खालीलपैकी कोणत्या पुरस्काराने गौरवण्यात आले होते ?**

१) पद्म भूषण २) पद्म विभूषण

३) पद्म श्री ४) भारतरत्न

**१३) भारतात सिंहगणना दर -------- वर्षांनी होते.**

१) दहा २) सात

३) पाच ४) दोन

**१४) लॉस एंजेलिस येथे पार पडलेल्या '९७ व्या ऑस्कर पुरस्कार वितरण समारंभात' खालीलपैकी कोणता चित्रपट सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला ?**

१) द ब्रुटलिस्ट २) नो अदर लँड

३) अनोरा ४) द गर्ल इन द ऑर्केस्ट्रा

**१५) भारताचे सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त कोण आहेत ?**

१) राजीव कुमार २) ज्ञानेश कुमार

३) सुशील चंद्रा ४) सुनील अरोरा

---

## एप्रिल २०२५ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (एप्रिल २०२५) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) २ | २) ४ | ३) २ | ४) ३ | ५) २ |
| ६) १ | ७) २ | ८) ३ | ९) २ | १०) २ |
| ११) ४ | १२) ३ | १३) ३ | १४) ३ | १५) २ |

## कुतूहल (मार्च २०२५) यशस्वी स्पर्धक

**सातारा –** कु. सुवीर फडे, **कोल्हापूर –** कु. पायल खुटाळे

**ठाणे –** कु. अनन्या भेरे, **वर्धा –** कु. आदित्य होले

**सांगली –** कु. प्रज्ज्वल पाटील **पुणे –** कु. अनुराग आवेकर

**नांदेड –** कु. गजानन लाकडे

## चित्रकोडे (मार्च) यशस्वी स्पर्धक

**बुलडाणा –** कु. सपना मिश्रा,
**सातारा –** कु. सुवीर फडे, कु. श्रीयांश सावंत, कु. परी पवार,
**कोल्हापूर –** कु. आदिती यादव, कु. वीरांगणा हांडे, कु. विराज नकाते, कु.अनिरुद्ध यादव, कु. देवराज सिंघण, शौर्य पाटील, कु. पूजा पाटील, कु.पियुष कांबळे.
**रत्नागिरी –** कु. साहिल गवंडी, कु. तनिष भायेकर, कु. अर्णव शिंदे, कु.प्रज्ञा आयरे, कु. शौर्य ठाकूर, कु. कैलास सावंत, कु. गौरी दसुरे, कु. दुर्वा चव्हाण, कु. जीनत शेख, कु. अथर्व पवार, कु. तेजस भुवड, कु. अन्वेश जाधव, कु. सोहम भुवड, कु. सोनल भुवड, कु. साजिरी भुवड, कु. शरिफा चोगले, कु. अनीश भुवड,
**सिंधुदुर्ग –** कु. आरोही राऊत, कु. हर्षाली घाडी, कु. विनय वाडेकर, कु.योगिनी परब, कु. समृद्धी गोरुले, कु. स्वरूप परब, कु. पूर्वा घाडी, कु.अंश घाडी, कु. दिव्या गोरुले, कु. राज वाडेकर, कु.रामदास साळस्कर, कु. गौरी साळस्कर, कु. शुभ्रा राडये, कु. गौरी आयरे, कु. रुद्राक्ष देवरूखकर, कु. आनंद घाडी, कु. मेघना मेस्त्री, कु.गौरी गुरुले, कु. यशश्री राऊत, कु. गौरी गोरूले, कु. सिद्धेश शिंदे, कु.क्रिश शिंदे, कु. भूपेंद्र सावंत, कु. यश मेस्त्री, कु. नंदिनी धुरी, कु.चैताली धुरी, कु. नेहा मेस्त्री, कु. धनश्री तारी, कु. खुशी धुरी, कु.मानव नाईक, कु. वासंती धुरी, कु. तेजस्विनी कदम, कु. वेदिका फटकारे, कु. लीना परब, कु. अनन्या पवार, कु.वीर वारंग, कु. दुर्वा मेस्री,
**ठाणे –** कु. अनन्या भेरे,
**वर्धा –** कु. अंशुल देशमुख, कु. त्रिशुल देशमुख, कु. आदर्श चरडे, कु. श्रेया वैराळे, कु. आराध्या प्रांजळे, कु. स्वस्तिका चरडे, कु.मिसबत शेख, कु.ईश्वरी लंगडे, कु. भक्ती कनेर, कु. श्रावणी सरदार, कु. श्रृतिका सरदार, कु. आदर्श चरडे, कु. दीप होले, कु.स्नेहल सरदार,
**अहिल्यानगर –** कु. आदिती जाधव,
**पुणे –** कु. तनिष्का साळुंके, कु. श्रेणिका ठोंबरे, कु. अनुराग आवेकर, शौर्यवीर तोरकड,
**नाशिक –** कु. जय आहिरे, **मुंबई–**कु.वैभवी पवार
**सांगली –** कु. प्रज्ज्वल पाटील
**बीड –** कु. शामल गरत, कु. आरशिया शेख, कु. सिद्धी देवकर, कु.निकीता दुधाळ, कु. अश्विनी शेळके, कु. दिव्या गायकवाड, कु. समीक्षा देवकर, कु.श्रुती गायकवाड, कु. आलिया शेख, कु. अश्विनी शेळके, कु. आदित्य भालेराव, कु. यश सानप, कु. श्रेयश गायकवाड, कु. रोशनी गायकवाड, कु.संस्कार दुधाळ, कु.श्रेयश देवकर, कुंप्रिन्स बडे, कु. शिवन्या गायकवाड, कु.सिद्धांत दुधाळ, कु.संचिता सालपे, कु.भक्ति शिंदे, कु. वैष्णवी सानप, कु. श्रावणी दुधाळ,
**नागपूर –** कु. नीरजा कुलकर्णी, कु. अवनीश जोशी
**रायगड –** कु. सोहम राऊत, कु. वेदिका पेंढारी, कु. हर्षली पारधी, कु. भक्ती आग्री

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



## मी केलेली मदत

आज गुरुवार. आठवडी बाजाराचा दिवस, शाळा सुटली, मी घरी जात होते. तितक्यात मला माझ्या मॅडम बाजारात दिसल्या. त्यांच्या हातात भाज्यांनी भरलेल्या दोन जड पिशव्या होत्या. त्या जड पिशव्या घेऊन चालणे त्यांना जरा अवघडच जात होते. मी धावतच त्यांच्याजवळची गेले. त्या नको म्हणत असतानाही मी त्यांच्याजवळची एक पिशवी घेतली व त्यांना त्यांच्या घरी सोडले. घरी पोहोचल्यावर मॅडमने मला खाऊ दिला आणि म्हणाल्या, ''अशीच सर्वांना मदत करत जा.'' घरी गेल्यावर मी आईला हा प्रसंग सांगितला. आईने मला कुशीत घेतले व पाठीवरून हात फिरवत म्हणाली, ''शाब्बास बाळा, अशीच सर्वांना मदत करत जा. मला तुझा खूप अभिमान वाटतो.

**कु. ओवी अमोल गायकवाड**
जि.प.प्राथमिक शाळा चाफळ मुली,
ता. पाटण, जि. सातारा.



उन्हाळ्यात सुट्टीत मी माझ्या आजीकडे अंधेरीला गेले होते. कडक ऊन तापले होते. काही कबुतरे सावली शोधत आमच्या गॅलरीत आलेली मी पाहिले. मी स्वयंपाकघरात जाऊन मूठभर तांदूळ आणले व ते हळूच गॅलरीत पसरले. एका भांड्यात पाणी घेऊन ते गॅलरीत ठेवले व हळूच आतून लपून त्या कबुतरांना पाहत उभी राहिली. त्या कबुतरांनी गॅलरीतले तांदूळ टिपले व पाणी पिऊन ते आनंदी दिसत होते. कबुतरांना आनंदी पाहून मलाही आनंद झाला. संपूर्ण उन्हाळा मी दररोज कबुतरांसाठी व इतर पक्ष्यांसाठी गॅलरीत तांदूळ व पाणी ठेवत होतो. ते पाहून माझ्या आजीला माझे खूप कौतुक वाटत होते व ती कौतुकाने सर्वांना सांगत होती.

**कु. वैष्णवी संतोष झोरे**
जि. प. प्राथमिक शाळा चाफळ, मुली,
ता. पाटण, जि. सातारा ४१५५२०.



प्रजासत्ताक दिन झाला होता. त्यानंतर दोन तीन दिवस झाले असतील. मी घराजवळ खेळत होते. तेव्हा मला मातीमध्ये तिरंगा झेंडा पडलेला सापडला. तो मी उचलला घरी गेले, त्याला स्वच्छ धुतला आणि पुन्हा त्याला एक काठी लावली आणि आईबाबांना दाखवले आणि म्हणाले की, ''आपला राष्ट्रीय तिरंगा जमिनीवर पडता नये, म्हणून मी त्याला घरी आणले.'' हे ऐकून तिला माझे खूप कौतुक वाटले. एवढ्याशा वयातदेखील आपल्या राष्ट्रीय झेंड्याबद्दल असलेली भावना, प्रेम बघून त्यांना माझा अभिमान वाटला.

**कु. जिनत जावेद शेख**
जि.प.पूर्व प्राथमिक शाळा गवाणे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग



मी एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत माझ्या मावशीच्या गावाला गेले होते. त्या गावाचे नाव ईट होते. मग मी आणि मावशीची लहान मुलगी बाहेर पुस्तक वाचत बसलो होतो. एक चिमणी तारेचा करंट लागून खाली पडली होती. मग मी तिथे लगेच धावत गेले व तिला एका मोठ्या पानावर उचलून घेतले. मग मी तिच्यावर पाणी शिंपडले. मग त्या चिमणीचे डोळे उघडले व ती चिमणी तिथून उडून गेली. आमच्या गावाला परत आल्यावर मी हे आई व बाबांना सांगितले. त्या दोघांनी मला शाबासकी दिली व म्हणाले की, ''अशीच कोणाचीही मदत करत जा.''

**कु. ऋचा शिवाजी गायकवाड**
जि.प.प्राथमिक शाळा राघुचीवाडी,
ता. जि. धाराशिव ४१३५०१.



मी एकदा माझ्या वडलांसोबत सायकल दुरुस्त करण्यासाठी आष्टीला गेलो. माझ्या वडलांनी सायकल दुरुस्त करण्यासाठी दुकानात लावली. माझे वडील व मी तिथे एका बाजूला बाकावर जाऊन बसलो. तेवढ्यात माझे लक्ष रस्ता ओलांडण्यासाठी थांबलेल्या एका म्हाताऱ्या आजोबांकडे गेले. मी त्यांच्याजवळ जाऊन म्हणालो, ''आजोबा तुम्ही इथे का थांबला आहात?'' ''बाळा मी रस्ता पार करण्यासाठी उभा आहे.''

''मला मदत करशील का?'' मी ''हो'' असे म्हणालो. मग मी त्या आजोबांना रस्ता पार करून दिला. मला खूप आनंद झाला. सकाळी शाळेत मी आमच्या सरांना सर्व हकिकत सांगितली. त्यांनी मला शाबासकी दिली व एक 'किशोर' मासिक बक्षीस दिले. मला खूप खूप आनंद झाला.

**कु. तुषार रामदास घुले**
जि.प.प्राथमिक शाळा, केळसांगवी, ता. आष्टी, जि. बीड ४१४ २०८.

# उमलती प्रतिभा

## माझी आई

माझी माय माझी माऊली
सुखदु:खात देते सावली
नेहमीच प्रेरणादायी
माझी आई

मायेने घास भरवणारी
शाबासकीची थाप देणारी
पुढे पुढे जा म्हणणारी
माझी आई

माझ्या भविष्याचा आधार
ठेवते मला योग्य मार्गावर
स्वभावाने समजूतदार
माझी आई

डोळ्यांतील अश्रू पुसणारी
मला खंबीर बनवणारी
कष्टाचा संदेश देणारी
माझी आई

कु. जान्हवी सचिन निंबाळकर
जि. प. केंद्रशाळा निंबळक
ता. फलटण, जि. सातारा ४१५५२३.

## उन्हाळ्याची सुट्टी

परीक्षा संपली लागली सुट्टी
चला करूया उन्हाळ्याशी गट्टी
कॅरम खेळू पोहणे शिकू
सुट्टीच्या दिवसांचे नियोजन आखू
दुपारच्या उन्हात सरबत पिऊ
लालेलाल टरबूज मजेने खाऊ
वेगवेगळ्या आंब्यांचा करूया आमरस
खाता खाता ठरवूया आहे कोणता सरस
पापड, लोणचे करेल आई व ताई
त्यांच्यासोबत डबे भरण्याची करू घाई
पुढे लागेल निकालाची ओढ
मनासारखे गुण आले की सुट्टी होईल गोड.

श्रीजित ताठे
महाराष्ट्र बालक मंदिर,
अहिल्यानगर



कु. अपेक्षिता राजेश सासे
इयत्ता ८ वी, सर्वोदय विद्यालय कुडवली,
ता.मुरबाड, जि.ठाणे-४२१४०१.



कु. आदित्य निनाद राणे
इयत्ता ८ वी, कार्मलाईट कॉन्व्हेंट इंग्लिश हायस्कूल,
ता.वसई, जि. पालघर

# अनुभव

आमच्या सहलीला खूप मजा आली कारण आम्ही समुद्रावर फिरायला गेलो व एकवीरा आईच्या दर्शनाला गेलो होतो. आम्ही सकाळी ४.३० ला निघालो. पहिल्यांदा आम्ही ९.०० वाजता एकवीरा आईच्या गडाच्या पायथ्याशी पोहोचलो. मग आम्ही सगळे गट करून गड चढत दहा ते साडे दहा वाजेपर्यंत पोहोचलो तेथे रांग खूप होती. अर्धा तास त्या रांगेत थांबून मग आम्ही दर्शन घेतले. येताना एक बाबा दिसले. ते म्हणाले, ''काही तरी दे रे'' मग मी बिस्कीट दिले. ते म्हणाले, ''खायला नको पैसे द्या.'' मग मी पाच रुपये दिले. नंतर आमच्या वर्गातील एका मुलाकडे याच बाबांनी पैसे मागितले. मग त्याने पाचशेची नोट काढली. तो म्हणाला की, ''माझ्याकडे सुट्टे पैसे नाहीत; पाचशे रुपये दिले तर चालतील?'' त्याचा भाऊ म्हणाला ''अरे काय करतोस? पाचशे रुपये देतोस?'' ते बाबा म्हणाले, ''तुमच्या दोघांचा पाचवीमध्ये पहिला क्रमांक येईल. द्या मला पाचशे रुपये'' बाबांना त्या मुलाने मागचा पुढचा विचार न करता पैसे दिले व खाली आले. तेथेच पुढे आम्हांला एक मुलगी म्हणाली, ''कुछ दो दीदी'' आम्ही तिला दहा रुपये दिले. ती बोलली ''नको खायला दै दो'' मग आम्ही आमचा अर्धा खाऊ तिला दिला. ती खूश झाली.

पाचवीचा निकाल लागला. त्या बाबांनी सांगितले म्हणून या दोघांनी काहीच अभ्यास केला नव्हता आणि ते नापास झाले. मी अभ्यास करून नव्वद टक्क्यांनी पास झाले.

आशीर्वाद आहे म्हणून मेहनत नाही सोडायची. आपण पूर्ण प्रयत्न करायचा.

**प्रणिता गणेश शिंदे**
महात्मा फुले विद्यालय, खोडद, ता. जुन्नर, जि. पुणे.



**कु. आराध्या किशोर आधाने**
इयत्ता तिसरी, जि.प.केंद्र प्राथमिक शाळा, गढाना, ता. खुलताबाद, जि. संभाजीनगर



**कु. संचिता सचिन सिनारे**
जि.प. प्राथमिक शाळा, तुकारामनगर, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर.


जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
हेच तर आहेत जादूगार विक्रम. त्यांचा जादूचा प्रयोग असतो तेव्हा हाच फोटो असतो.
हो. हाच फोटो मी बघितला. आपण भेटलो ते जादूगारच होते...
फोटोत आपण सर्व जण कॅमेऱ्याकडे बघतोय आणि जादूगार मात्र तिरके बघत आहे.
हो खरंच रे! जरा झूम करून बघ त्या बाजूला...
विनयने फोटो झूम करून बघितला.
बापरे! त्या तिकडे पडद्यामागे कुणीतरी आहे. बंदूक घेऊन...
हो... खरंच रे!
त्याला आपण बघावे म्हणून त्यांनी तशी पोज दिली असावी–गॉगल काढून...
नक्की काहीतरी घोळ आहे त्यांच्या बंगल्यात...
मलाही तसंच वाटतंय... तसाही तो गॉगलवाला गुंडच वाटत होता.


मला वाटतंय, त्या गुंडाने जादूगाराला ओलीस ठेवलं असावं. पण कशाकरीता? ते चोर तर नसावेत.
म्हणजे ते आपल्या स्नेहसंमेलनाला येणार नाही?
आपण हे सर्व पोलिसांना सांगायचं का?
हे खरं असेल कशावरून? उगाच आपली फजिती होईल.
आयडीया! आपण त्या बंगल्याच्या मागच्या बाजूने जाऊ या...
हो चला...
तिघेही बंगल्याच्या दिशेने निघाले...
हळूच ते बंगल्यात शिरले.
बापरे ! ते तिकडे बघा!
क्रमशः

# जंतर मंतर बमचिक बम

डॉ.नरेंद्र खैरनार

जादूगारा जादू तुझी, वाटे जणू खरी
जादूच्या या नगरीत, आनंदाच्या सरी
अगडम बगडम बमचिक बम
जंतर मंतर बमचिक बम

रुमालाचं फूल होई, फुलाची हो काठी
आश्चर्याचे शब्द येती, मुलांच्या ही ओठी
इथे तिथे साऱ्यांना ही, भावे जादूगिरी
जादूच्या या नगरीत, आनंदाच्या सरी

नवं काही पहायला, मनाने झुरावे
जंतर मंतर मंत्राने, कापरे भरावे
छू मंतर म्हणताना, वाटे किती भारी
जादूच्या या नगरीत, आनंदाच्या सरी

जादूगारा जादूगारा, वाटे तुझा हेवा
भरभर लिहिणारा, पेन मला हवा
जादू नगरीची यावी, मजा खरीखुरी
जादूच्या या नगरीत, आनंदाच्या सरी

संपर्क : ९४२१८८४०२४



इंग्रजी विभाग

# The sun shine

Jitendra Raipure



How the sun rays
Come to the earth,
Everywhere shines
And new day birth.

New dawn of life
New rays of hope,
Every little being
Joy on the top.

Spread the wings
Up in the sky,
No barrier no limit
No bounds to fly.

Fragrance of flowers
Spreads everywhere,
whispers the breeze
Confer with all over.

Everyone wonders
How moves it west,
Weaving the birds
Future in the nest.

**Contact : 8806550920**

# Happy Holidays : Fun, Learning and Growth

Dr. Sanjay Gaikwad

Holidays are the most exciting time for students! After studying, following a strict daily routine, doing homework students feel wonderful. Yes, it is really the time to relax. It is the time to have fun with family and friends. But don't take it otherwise. Holidays are not just about resting and playing. It is an opportunity to learn new things and try innovative and useful activities. We can even develop good habits as well. Always remember the saying 'Make hay while the sun shines.' How can we make our holidays enjoyable and meaningful? Let's explore some creative and meaningful ways to spend holiday time wisely! Let's find out how students can use their holidays in the best way!

**Enjoy and Relax:**

Always remember that holidays are the time to rest and have fun. After many days of school, studying and homework, your body and mind need a break. Spend time with your family, talk to them, and have meals together. Watch your favourite cartoons or movies and laugh a lot. Go outside and play games like cricket, football or badminton with your friends. Running and playing will make you happy and strong. "All work and no play makes Jack a dull boy." So, balance rest and fun! If you only sleep or watch TV and mobile all day, you may feel lazy. If you play too much, you might get tired. A little bit of both will keep you fresh, happy, and full of energy!

**Learn Something New :**

Holidays are the perfect time to try new



things. We can start a fun hobby like painting, singing, dancing or gardening or anything of our choice. These activities will make us happy, energetic and creative.If you love reading, simply pick up a storybook. It will take you on exciting adventures. It can teach us new things.You can also learn many useful skills. Try learning a new language, beautiful handwriting or even cooking. Helping in the kitchen can also be fun! Remember, don't put all your eggs in one basket. Try different activities to make holidays interesting, useful and enjoyable!

**Stay Active and Play Outdoors:**

Most of the students prefer indoor games. They also spend their precious time to play useless games and watch cartoons on mobile phones. They also waste their time watching TV which creates health issues. Students, playing outside is fun and good for your health.

We can enjoy sports like cricket, football, badminton or cycling. These games make our body strong and energetic. Walking, Running, jumping and playing in the fresh air keep our mind happy, fresh and enthusiastic. A healthy mind is there in a healthy body. Playing with friends also teaches you teamwork and sharing. Play, and enjoy your holidays in a healthy way!

**Help at Home:**

Holidays are a great time to help the family members. One can help even with small tasks. Doing small chores makes ushelpful. It builds our image.We can clean our room. We can put our toys, books and clothes in the right place. We can arrange our books neatly. It helps us to find the books easily and quickly. Tree plantation and wateringis also a good way to protect nature.Helping in the kitchen is alsofun and useful! We can help our parents by washing vegetables, setting the table and performing simple tasks.When you help at home, your family feels happy and you learn teamwork and kindness. So, always try to help in small ways!

**Travel and Explore:**

Yes! Travel makes man wiser. If you get a chance to travel in the holidays don't miss it! Visiting new places is exciting. It helps us tolearn new things.We can visit a village and understand how people live close to nature. A tourof a hill station will let usenjoy cool weather and dazzling mountains. By visiting a historical place, we can learn about kings, forts and specific history.A short visit to a park, zoo or museum can be fun even. We can see new animals, beautiful plants and amazing things. Travelling helps usto understand different cultures and traditions. It makes ussmart and curious!

**Stay Connected with Reading :**

Always stay connected with reading. It makes us smarter. It improves our knowledge, personality and overall character. Whatever be our likings and dislikes one must be an avid reader. Reading extracurricular books, self-help books and personality development books increases our horizons. To be successful in our field we, students must utilise holidays to read more and more books. To read books should be the passion of students. If it is so the passion will be converted into a mission soon. And the mission will be completed sooner or later.

**Express Yourself :**

Communication plays a vital role in our lives. Holidays are a great time to try new things and express yourself. We can write a holiday diary. The diary is meant to note down striking experiences. We have to communicate it in the diary and share it with our near and dear ones. It will help us to remember the memorable moments. If you love poem writing, try making a poem about your holidays. Expressing ourselves in different ways will make our holidays more exciting and more special!

**Spread Kindness:**

Do good things for others and good things will happen in our lives. Holidays are a good time to do something for others! We can help our friends with their studies. We can feed a hungry stray animals. We can plant a tree to help the environment. One can also visit an old-age home or orphanage with and spend quality time with elderly people. Small acts of kindness bring happiness in the life of others. It makes our holidays quite special and meaningful!

**Contact : 9422716677**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Draw the missing part of each object and colour them.**









**Draw the short and long hands on the clocks to show the given time.**



10:12



12:20



5:15



7:30



12:45



1:05

# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ मे २०२५.

३) कोड्याचे उत्तर जून २०२५ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal Regd.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.04.2025, Date of Posting - 27th & 28th April 2025 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)












कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा

लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड







किंमत प्रत्येकी
₹ १६३ /-
(५०% सूट)





किशोर

वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-


**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग,
पुणे – ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० – २५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,